। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १४५ वा । शुक्रवार दिनांक १५ ऑगस्ट, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

dainiklatursamachar@gmail.com




## घरोघरी तिरंगा -२०२५: धाराशिव येथे जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित सायकल रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद



धाराशिव दि.१४,(जिमाका):- जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात आज घरोघरी तिरंगा -२०२५ अंतर्गत भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या रॅलीत जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष,राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक हर्षवर्धन शिंदे,जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे,कार्यकारी अभियंता नरसिंग भंडे,जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे,सामाजिक वनीकरणचे विभागीय वन अधिकारी विश्वास करे,जिल्हा रोजगार व मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त संजय गुरुव, उपअभियंता (सा.बा.विद्युत) जी.आर. सिरसाळकर सांख्यिकी सहाय्यक गणेश खांडेकर,श्रीमती कल्पना काशीद, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी प्रवीण बागल आदीसह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा क्रीडा विभागाच्या आयोजनाखाली काढण्यात आलेल्या या रॅलीत शहरातील खो-खो,खेलो इंडिया सेंटर,श्रीपतराव भोसले हायस्कूल,छत्रपती शिवाजी हायस्कूल येथील २०० विद्यार्थी तसेच अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले.

प्रारंभी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) स्वाती शेंडे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ करण्यात आला.ही रॅली जिल्हाधिकारी येथून निघून पोलीस अधीक्षक कार्यालय मार्गे,महात्मा बसवेश्वर चौक,बार्शी मार्गावरील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत रॅलीचा समारोप करण्यात आला.

## करजखेडा दुहेरी हत्याकांडातील दोन्ही आरोपीस २४ तासाचे आत स्थानिक गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या

धाराशिव (प्रतिनिधी)- अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना (प्रभारी पोलीस अधीक्षक), यांचे मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस ठाणे बेंबळी येथील अतिशय संवेदनशील अशा दुहेरी हत्याकांडातील आरोपीचा तात्काळ शोध घेण्याबाबत आदेशीत केल्याने पोलीसांनी गुन्हाचा शोध लावला असून या बाबत पोलीसाकडून समजलेली माहिती अशी की, बीएनएस गुन्ह्यातील निष्पन्न आरोपीचा शोध घेणेकामी रवाना होवून नेमुन निष्पन्न संशयित जिवन हरीबा चव्हाण, हरीबा यशवंत चव्हाण यांची माहिती घेत असताना पथकास बातमीदार यांचे कडुन माहिती मिळाली की, नमुद दोन्ही व्यक्ती हे पुणे येथे त्यांचे नातेवाईकाकडे गेले आहेत. त्यावरुन पथकाने सदरची माहिती वरिष्ठांना कळवून त्यांचे आदेशाने तात्काळ वरील नमुद स्टाफसह पुणे येथे जावून नमुद संशयित आरोपीचा शोध घेतला असता ते जनता वसाहत पर्वती पायथा पुणे येथे नातेवाईकाचे घरी असल्याची माहिती मिळाल्याने तेथे जावून अतिशय शिताफीने त्यांना ताब्यात घेवून त्यांना पुढील कार्यवाही कामी पोलीस ठाणे बेंबळी येथे हजर केले आहे.

सदरची कामगीरी अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना (प्रभारी पोलीस अधीक्षक), यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खटके, पोह/ विनोद जानराव, नितीन जाधवर, दयानंद गादेकर, बळीराम शिंदे, राहुल नाईकवाडी, पोना/बबन जाधवर, अशोक ढगारे, चापोह/विजय घुगे, महेबुब अरब यांच्या पथकाने केली आहे.

## धाराशिव प्रशालेत ध्वजारोहण; विविध देशभक्तीपर उपक्रमांनी उत्साहात जल्लोष




धाराशिव (प्रतिनिधी)- स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा या देशव्यापी उपक्रमाचा भाग म्हणून, धाराशिव प्रशाला व स्वामी रामानंद तीर्थ प्राथमिक विद्यामंदिर, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक १३ ऑगस्ट रोजी ध्वजारोहणाचा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला.

धाराशिव प्रशालेचे मुख्याध्यापक पंडित जाधव यांच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकवण्यात आला. या प्रसंगी देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. चंद्रकांत माळी यांनी केले, तर प्रास्ताविक श्री. रमण जाधव यांनी करून स्वातंत्र्यदिनाचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित केले. आभार प्रदर्शन श्री.रामेश्वर चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाला दोन्ही शाळेतील शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर देशभक्तीची उमेद आणि अभिमान स्पष्टपणे दिसत होता.

## धाराशिव अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दि.१३.०८.२०२५ रोजी अवैध मद्य विरोधी धाराशिव जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत १० कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले १,१४० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव, २०५ लिटर गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या ४८ सिलबंद बाटल्याअसे मद्य जप्त करण्यात आले. सदर जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे ८३,३४० आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधीत पोलीस ठाण्यात १० गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ३ ठिकाणी छापे टाकले. महेश रा.मुर्टा ता. तुळजापूर जि.धाराशिव हे ११.३० वा. सु. मुर्टा येथे अंदाजे १,६०० किंमतीचे २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. अजय रा. कौडगाव तांडा ह.मु. अंबेजवळगे ता. जि. धाराशिव हे १६.३० वा. सु. अंबेजवळगे शिवारातील आपल्या शेतात अंदाजे ६२,००० किंमतीची १०० लिटर गावठी दारु व १,१२० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. तर सुशील रा. सास्तुर ता. लोहारा जि. धाराशिव हे १८.०० वा. सु. सास्तुर बाजार कट्टा येथे अंदाजे २,२४० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २८ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या.

## पालकमंत्री प्रताप सरनाईक यांणी स्वर्गीय विलासराव देशमुख यांना वाहीली आदरांजली



धाराशिव (जिमाका) --पालकमंत्री प्रताप सरनाईक हे आज लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी माजी मुख्यमंत्री,माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त बाभळगाव येथे विलास बागेत स्मृतिस्थळी आदरांजली अर्पण केली.

यावेळी स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्या घरी जाऊन त्यांचे चिरंजीव माजी मंत्री तथा आमदार अमित देशमुख व माजी आमदार धिरज देशमुख यांची सदिच्छा भेट देखील घेतली.

यावेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की,राजकीय कारकीर्दीत सातत्याने विलासराव देशमुख यांचे मार्गदर्शन मला लाभले.मी त्यांच्या नेतृत्वाकडे एक आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून पाहत आलो आहे. राजकारणात आमचे 'प्रवाह' जरी बदलले असले तरी त्यांचे व कुटुंबियांसोबतचे ऋणाणूबंध नेहमीच चांगले राहिले आहेत.

## क्राईम न्युज

### पोलिसांचे जाहीर आवाहन


धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक, धाराशिव जिल्हा यांचे वतीने सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासनाच्या निर्देशाप्रमाणे तसेच मा. पोलीस अधीक्षक धाराशिव यांच्या आदेशाने जिल्ह्यामध्ये अंमली पदार्थ विरोधी कारवाई करीता -पींळ छरीलेंींळली सुरु करण्यात आले असुन अंमली पदार्थ सेवण करणे, बाळगणे, वाहतुक करणे, विक्री अथवा खरेदी करणे अशा व त्यासंबंधाने कृती करणाऱ्या इसमांबाब काही माहिती आपणास मिळाल्यास तात्काळ ८९९९८९०४९८ या मोबाईल क्रमांकावर व्हाटसप, एसएमएस अथवा कॉलद्वारे माहिती देण्यात यावी. तसेच रपींळपरीलेवर्हींसारळश्र.लो या ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावी. माहिती देणाऱ्याचे नाव व मोबाईल क्रमांक गोपनिय ठेवण्यात येईल.

## भारतीयांनी मनामनात आपला राष्ट्रध्वज रुजविला पाहिज-प्रा. विनंती बसवंतबागडे




मुरूम (सुधीर पंचगल्ले)-स्वातंत्र्य चळवळीतील बलिदानाचा इतिहास भारतीयांनी मनामनात आपला राष्ट्रध्वज रुजविला पाहिजे, असे प्रतिपादन फार्मसी महाविद्यालयाच्या प्रा. विनंती बसवंतबागडे यांनी केले. श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागात राष्ट्रीय सेवा योजना व माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हरघर तिरंगा व तंबाखूमुक्त अभियानांतर्गत गुरुवारी (ता. १४) रोजी प्रमुख व्याख्यात्या म्हणून त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे होते. यावेळी नगर शिक्षण विकास मंडळाचे संचालक प्रा. डॉ. सतिश शेळके, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार आदींची उपस्थिति होती.

पुढे बोलताना प्रा. बसवंतबागडे म्हणाल्या की, राष्ट्रध्वजाचे महत्त्व व राष्ट्रध्वजाचा पूर्व इतिहास विस्ताराने त्यांनी या वेळी मांडला. याप्रसंगी उपस्थितांना त्यांनी तंबाखूमुक्ततेची शपथ दिली. अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. सपाटे यांनी तरुणांनी राष्ट्रध्वजाचा स्वाभिमान बाळगून त्याचे पावित्र्य जतन केले पाहिजे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत तर आभार प्रा. अशोक बावगे यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.




ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## स्वातंत्र्याचा वर्धापन दिन

भारतीय स्वातंत्र्याचा वर्धापन दिन साजरा करताना सर्वांना आनंद होत आहे. पारतंत्र्याच्या तावडीतून मुक्त झालेला दिवस १५ ऑगस्ट १९४७ आहे. या दिवशी भारतीय जनता पारतंत्र्यातून मुक्त झाली. 'जयहिंद' व 'वंदे-मातरम्' म्हणण्याची मुभा मिळाली. ब्रिटीशांनी दिडशे वर्ष आपल्यावर राज्य केले. केवळ राज्य केले असे नाही तर अतोनात अत्याचार, अन्याय केला केला. भारतीय मुळ संस्कृती लोप पावण्यासाठीचे वाईट कृत्य केले. भारतीयांत एकोपा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. जाताना भारताचे तुकडे करण्याचे मोठे पाप केले. त्याचे भोग आज ही भोगावे लागत आहे. भारताला स्वराज्य मिळावे म्हणून देशातील सर्व जाती, धर्माच्या लोकांनी हातभार लावला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर यात प्रामाणिक मंडळी बाजूला झाली. आम्हाला स्वराज्य हवे ते मिळवुन दिले. स्वराज्याचे सुराज्य करण्याचे काम भावी पिढीने करावे असे विचार होते. नेताजी सुभाषचंद्र बोस, लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल अशी जहाल कट्टर देशभक्त मंडळी बाजूला झाली. यात शिरेल ते मुत्सद्दी व स्वार्थी मंडळी! त्यामुळे स्वराज्याच्यावेळी जी मंडळी होती त्यांनी योग्य व दुरदर्शी विचार केला नाही. मवाळ लोकांच्या हाती सुत्रे दिली गेली. याचा परिणाम आजही भोगावा लागत आहे. जम्मूकाश्मीरचा प्रश्न असो किंवा एकाच समाजाची वाढती लोकसंख्या हा चिंतेचा विषय आहे. देशात राहाणारे हे राष्ट्रप्रेमी असले पाहिजे. भारतात राहुन जर दुसऱ्या देशावर प्रेम करणारे असतील तर याची किंमत अल्पावधित भारतीयांना मोजावी लागणार आहे. देशात अनेक स्टेट विलीन झाली. असे असताना भारताची विभागणी करण्याची गरज नव्हती. भारतात एक वेगळे स्टेट निर्माण केले असते. नवीन देश निर्मतीस वेळ काढू पना केला असता तर कांही बिघडले नसते. गरज नसताना तातडीने नवीन देश निर्माण करण्याची घाई शांतताप्रिय, अहिंसावादी विचाराच्या नेत्यांनी केली. मोठ्या प्रमाणात निधी दिला. ज्यांना त्यांच्या देशात जायचे त्यांनी जावे. ज्यांना राहवयाचे झाले तर राहावे. असेही मत व्यक्त केले. त्याच वेळी एक घाव दोन तुकडे केले असते तर दोघांनाही आज त्रास झाला नसता. आज कोण शांत आहे. पाकिस्तानमध्ये भारत कधी सर्जीकल स्ट्राईक करेल याची भीती मनी असणार. पाकिस्तानी दहशदवादी घुसखोर भारतात करतात. भारतीयांवर नाव विचारून गोळ्या घालतात. आपण या बदल्यात काय करतो? आज तसे सांगण्याची गरज नाही. प्रत्येकांना माहिती आहे की, स्वराज्याच्यावेळी ठरविकांची चलती होती. पाकिस्तानला भारताचा भूभाग दिला तसेच चीनला भाई-भाईचा नारा दिला. दोघांनी काय दिले. भारतीय सैन्य व नागरिकांना लक्ष्य करण्याचे काम केले. भारताला स्वराज्य मिळाल्यानंतरही सीमावर्ती भाग शांत नाही. पाकिस्तान सोबत संबंध चांगले राहावेत यासाठी अटलबिहारी बाजपायी एवढे चांगले कोणी काम केले नाही. बस व रेल्वे सेवा सुरू केली. पाकिस्तानमधील असाध्य रोगी आहेत. त्यांना उपचारासाठी भारताची दारे खुली केली. वास्तविक स्वराज्याच्यावेळीचा इतिहास पाहिला तर भारतीयांचे मुडदे पाकिस्तान मधून पाठविले. मातृशक्तीची छाती कापून भारतात पाठवली. विटंबना केली तरी भारताची मवाळ भुमिकेमुळे आजही मोठी किंमत मोजावी लागते. भारताला आजही पुर्ण स्वराज्य मिळाले नाही, असे कधीकधी राष्ट्रप्रेमींना वाटणे स्वाभाविक आहे. कशाला पाकिस्तान निर्माण केला. कशाला चीनची मित्रता केली? यापासून काय साध्य झाले. केवळ हिंसा घडविणे हाच उद्योग एकमेव कार्यक्रम दिसून येतो. एक बाब भारतीयांनी लक्षात ठेवावी की, अहिंसेनी भारताला स्वराज्य मिळाले नाही. मोठ्या प्रमाणात हिंसा झाली. जालीयनवाला बागची घटना असो किंवा हजारोंच्या संख्येने हिंदु भारतीयांची हत्या केली, खून केला. रक्ताच्या नदी वाहील्या तरी अहिंसेने स्वराज्य मिळाले सांगितले जाते. भारताने अनेक सुपूत्र गमावले आहे. राजगुरू, सुखदेव व भगतसिंह सारखे फासावर लटकले गेले. फाशी रोखता आली असती. याचा इतिहास जाणून घेतला तर अंगावर शहारे निर्माण होतात. मुळात ब्रिटीश धुर्त व कपटी होते. त्यांनी ओळखुन सतत भांडणे व्हावीत. संघर्ष राहावा यासाठी खेळलेली चाल मध्ये यशस्वी झाले. भारतीय संस्कृती लोप पावावी. यासाठी सक्तीने गुरुकुल पद्धती बंद केल्या. इंग्रजीची सक्ती केली. या देशात जी प्रगती केली ती त्यांनी त्यांच्या फायद्यासाठी केली. रेल्वे निर्माण केले ते त्याच्या फायद्यासाठी भारतीयांसाठी काही केले नाही. उलट काही हस्तक बनले असल्याने भारतीयांना आज मोठी किंमत मोजावी लागत आहे. भारतीय सीमा शांत नाहीत. सतत घुसखोरी होत आहे. भारतीयांवर गोळ्या झाडत आहेत. हे योग्य नाही. स्वातंत्र्याच्यावेळी व नंतर मजबुत नेत्याच्या हाती सुत्रे दिले असते तर आज भारत महासत्ताधीस बनला असता. भारतीय शुरवीर आहेत. भारताचा इतिहास हा गौरवशाली आहे. केवळ काहींच्या चुकामुळे देश मागे पडला आहे. जशास तसे उत्तर दिले नाही. अहिंसेच्या नावाखाली सर्वस्व गमवावे लागले. एकीकडे शस्त्र व बंदुकीची गोळी होती. दुसरीकडे चरखा चालवुन किंवा अहिंसेची भाषा बोलली गेली? वास्तविक अहिंसेमध्ये शक्ती आहे मात्र ते कळणाऱ्यास समजेल. ज्यांना केवळ स्वार्थ दिसत होता. भारताचे वाटोळे करण्यासाठी चाल खेळणाऱ्या ब्रिटीशास वाटोळे करावयाचे होते. हे अनेकांना कळाले नाही. त्यामुळे आज आपण स्वराज्याचे सुराज्य करण्यात कमी पडत आहोत. भारताला स्वराज्य मिळून सत्त्याहत्तरवर्षापेक्षा अधिक काळ झाला. देशात बेकारी कमी झाली नाही. बालमृत्यूचे प्रमाण घटविता आले नाही. श्रीमंत हे श्रीमंतच झाले व गरीब हे गरीबच बनत आहे. ग्रामीण भागात कायमचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविता आला नाही. आपण काय प्रगती केली. भारताची बदनामी परदेशात जावुन केली जाते. एकसंघ देश ठेवण्यासाठी आजही काही त्रुटी आहेत त्यादूर केल्या पाहिजेत. भारताला स्वराज्य हे फुकट मिळाले नाही. मोठ्याकष्टाने शौर्याने मिळाले आहे हे विसता येवू शकत नाही. त्यामुळे स्वराज्याचे सुराज्य करण्याचा प्रयत्न सर्वांनी केला पाहिजे.

# लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त बाभळगाव विलासबागेत संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्याकडून स्मृतीस विनम्र अभिवादन




मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी गुरुवार दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त बाभळगाव येथील विलासबाग येथे जाऊन त्यांच्या स्मृतींना पुष्पांजली अर्पण करीत विनम्र अभिवादन केले.

त्यानंतर मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचा बाभळगाव निवासस्थानी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी सत्कार करून ''असा घडला भारत'' ग्रंथ भेट दिला. आणि त्यांच्याशी मराठा आरक्षण संदर्भात सविस्तर चर्चा केली. यावेळी उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी, माजी आमदार वैजनाथ शिंदे, लातूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, नामदेव चाळक, हंसराज जाधव, डी. एस पाटील कामखेडकर, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख आशिष काटे, नानासाहेब जाधव, अविनाश देशमुख आदी उपस्थित होते.

# ''हर घर तिरंगा'' अभियान हा देशप्रेम जागृत करणारा उपक्रम- आयुक्त श्रीमती मानसी

## मनपाच्यावतीने स्वातंत्र्यसैनिक, वीर नारी व जवानांचा सन्मान





**लातूर/प्रतिनिधी :** हर घर तिरंगा अभियान हे केवळ अभियान नाही तर प्रत्येक भारतीयाच्या मनात देशाविषयी अस्मिता आणि देशप्रेम जागृत करणारा उपक्रम आहे, असे मत मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी व्यक्त केले.

हर घर तिरंगा अभियान २०२५ अंतर्गत लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने स्वातंत्र्य सैनिक, वीरमाता व सध्या कार्यरत असणाऱ्या सैन्यातील जवानांचा सत्कार करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमही घेण्यात आले. विकास पुरुष विलासराव देशमुख उद्यान येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना श्रीमती मानसी बोलत होत्या.अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त पंजाबराव खानसोळे व मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे हे देखील यावेळी उपस्थित होते.

आयुक्त श्रीमती मानसी यांनी सांगितले की, शहराच्या विकासात स्वच्छतेची मोठी भूमिका असते. प्रत्येक लातूरकराने आपले शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे,असेही त्या म्हणाल्या.

यावेळी स्वातंत्र्यसैनिक, वीर नारी, माजी सैनिक व कार्यरत जवानांचा शाल, पुष्पगुच्छ व संविधानाच्या उद्देशपत्रिकेची प्रत देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी येळनुरकर रवींद्र सूर्यवंशी, प्रमोद दिलीप,देविदास अंबुलगेकर, लक्ष्मीकांत मनुकुलवार, श्रीमती मद्रावती क्षीरसागर, कौशल्याबाई वडे, मैनाबाई सलवया, सुकुमारबाई स्वामी, अनंतराव होळकर, ज्योती कुमारवडे,सत्यभामाबाई जोशी, ओमप्रकाश आर्य, श्याम काबरा, शरद भातांबरीकर, इंद्रकर्ण खडके, दिलीपसिंग बयास, सत्यवान बोरसने, राजाभाऊ गवळी, प्रवीण शिवणगीकर यांना यावेळी सन्मानित करण्यात आले.

प्रारंभी दीप प्रज्वलन व राष्ट्रगीत गायनाने कार्यक्रमाचे उदघाटन झाले. अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांनी प्रास्ताविकातून अभियानाचे महत्त्व सांगितले.मनपाच्या शाळा क्रमांक ६ मध्ये सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी सामाजिक संदेश देणाऱ्या भारुडांचे गायन झाले. मनपा शाळा क्रमांक ९ मध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. शाळा क्रमांक ११ व शाळा क्रमांक ३ यांनी कवायती स्वरूपात देशभक्तीपर गीते सादर केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सतीश चव्हाण तर आभार प्रदर्शन भांडारपाल बालाजी शिंदे यांनी केले.

## भादा परिसरातील जनतेनी पहिल्यांदाच अनुभवला आमदारांचा जनता दरबार

# आडवणूक नव्हे तर सोडवणूक करा आ. रमेशआप्पा कराड यांच्या सूचना

**लातूर/प्रतिनिधी :** वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या अडीअडचणी, वेगवेगळे प्रश्न आणि समस्या लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्यासमोर भादा सर्कल मधील नागरिकांनी जनता दरबारच्या माध्यमातून मांडल्या. या सर्व प्रश्नांची गांभीर्याने दखल घेत जे शक्य आहेत ते प्रश्न जागेवरच सोडविले. इतर प्रश्नांबाबत सामान्यांची महिनाभरात आडूवणूक नाही तर सोडवणूक करावी अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना आमदार महोदयांनी दिल्या. आजपर्यंत कधीही सहजपणे आमदारांना भेटता आले नव्हते, प्रश्न मांडता आले नव्हते मात्र भादा सर्कल मधील सर्वसामान्य जनतेला पहिल्यांदाच आमदाराचा जनता दरबार आणि रमेशअप्पांच्या माध्यमातून माणसातला आमदार अनुभवता आला. तब्बल साडेपाच तास सुरू असलेल्या या जनता दरबारातून प्रश्नाची सोडवणूक झाल्याने अनेकांना मोठे समाधान मिळाले.




सर्वसामान्य जनतेचे प्रश्न, व्यथा आणि अडीअडचणी समजून घेता याव्या त्यांच्याशी संवाद साधता यावा यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी ग्रामीण विधानसभा मतदार संघात असलेल्या औसा तालुक्यातील मौजे भादा येथील लक्ष्मी मंगल कार्यालयात बुधवार १३ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारला भादा जिल्हा परिषद मतदार संघातील जवळपास सर्वच २७ गावासह वाडी वस्तीतील नागरिकांनी सहभाग घेऊन वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या समस्यांचा पाढाच वाचला. यावेळी औश्याचेचे तहसीलदार घनश्याम अडसूळ, गटविकास अधिकारी आनंद निरगणे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, नवनाथ भोसले, अनिल भिसे, सतीश आंबेकर, मंडळ अध्यक्ष उद्धव काळे, सुरज शिंदे, प्रताप पाटील, पद्माकर चिंचोलकर, भाद्याचे सरपंच बालाजी शिंदे, राजकिरण साठे, अभिषेक आकनगिरे, बालाजी साळुंके, सोमनाथ पावले आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थित होती. यावेळी विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या १५ - १६ वर्षात आमदार साहेबांना गोरगरीब, सर्वसामान्य नागरिकांना भेटता आले नाही, आपले प्रश्न अडीअडचणी मांडता आल्या नाहीत. मात्र ज्यांनी आपल्याला भरभरून आशीर्वाद दिले त्यांचे आपण देणे लागतो या भावनेतून लातूर ग्रामीण मतदार संघातून निवडून आलेले नवनिर्वाचित आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याची भूमिका घेऊन, त्याच्या अडीअडचणी, प्रश्न समजून घेण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या जनता दरबारला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

या जनता दरबारमध्ये उपस्थित ग्रामीण भागातील नागरिकांनी शेतस्ते, अतिक्रमणे, शेतीतील वीज प्रश्न, अवैध दारू विक्री, विविध अवैध धंदे, बोगस रस्त्याचे कामे, पिक विमा, शासकीय अनुदानाच्या अडचणी, निराधाराच्या पगारी, राशन दुकानचे प्रश्न, प्रवासी बस थांबे, घरकुल, समशानभूमी, कबाले, समाज मंदिर, भादा ग्रामीण रुग्णालय यासह वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या समस्या, गऱ्हाणे मुक्तपणे नागरिकांनी मांडले. या जनता दरबारात तब्बल साडेपाच तास आमदार रमेशआप्पा कराड यांनी प्रत्येक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या. जे शक्य आहे त्या प्रश्नाचा तडकाफडकीने निर्णय केले. इतर प्रश्न महिनाभरात निकाली काढण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी दिल्या. या जनता दरबारात बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, विविध विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर न करता आपली जबाबदारी पार पाडावी. चांगले योग्य काम करणाऱ्याच्या मी पाठीशी राहीन मात्र गोरगरिबाची आडवणूक केली तर सहन करणार नाही आणि संबंधितास माफ करणार नाही, तेव्हा कुणाचीही अडवणूक होणार नाही तर त्याची सोडवणूक करा असे सांगून पाठीवर मारण्याचा मला अधिकार आहे, मात्र कोणाच्या पोटावर मारण्याची पाळी माझ्यावर आणू नका असेही त्यांनी बोलून दाखवले.

प्रत्येक शेतकऱ्याला हक्काचा रस्ता मिळाला पाहिजे कोणी अडवणूक करत असेल तर त्याच्याविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करून शेतकऱ्यांचे रस्ते मोकळे करून द्यावेत, तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहायकाने नेमून दिलेल्या गावी ठराविक दिवशी गेलेच पाहिजे. सर्व सामान्यांची छोटी, छोटी कामे गावात जाऊन सोडवावीत. प्रत्येक गावातील अवैध दारू विक्री आणि विविध अवैद्य धंदे करणाऱ्या विरुद्ध पॉलिसी खात्या दाखववा प्रसंगी संबंधिताची दिंड काढून तडीपारचे प्रस्ताव तयार करावेत धडक कारवाई करा मी तुमच्या पाठीशी आहे मात्र एकाही गावात अवैद्य प्रकार चालता कामा नये याची दक्षता घ्यावी. बोगस विविध रस्त्यासह इतरही कामाची चौकशी करून दोषी अधिकारी आणि ठेकेदार यांच्यावर कारवाई करावी अशा सूचनाही संबंधितांना त्यांनी दिल्या.

भादा येथे जनता दरबार घेऊन सामान्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असल्याबद्दल प्रारंभी आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार घनश्याम अडसूळ यांनी केले तर सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. भादा परिसरातील जनतेला आमदाराचा जनता दरबार पहिल्यांदाच अनुभवास मिळाला. आमदारांना प्रत्यक्ष भेटलो, माझी अडचण त्यांना सांगितली, त्यांनी समजून घेऊन अधिकाऱ्याला बोलले अनेक दिवसापासूनचे काम आज नाहीतर उद्या निश्चितपणे होईल अशी खात्री मिळाल्याने जनता दरबारात आलेल्या सर्व सामान्य माणसाच्या चेहऱ्यावर एक वेगळा आनंद दिसून येत होता.

या जनता दरबार कार्यक्रमास भाजपाचे वैभव सापसोड, हनुमंत बापू नागटिळक, वसंत करमुडे, बन्सी भिसे, रवींद्र पाटील, रेवनआप्पा पाटील, महादेव मुळे, शाम वाघमारे, राम मोरे, महादेव गुरुशेट्टे, रामकृष्ण जाधव, गिरिधर पवार, सतीश कात्रे, संतोष चव्हाण, वाजिद पटेल, अच्युत ईरपे, निळकंठ मुळे, शुभम खोसे या प्रमुख कार्यकर्त्यांसह नायब तहसीलदार, कृषी, महावितरणचे अधिकारी कर्मचारी, लघु पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिप बांधकाम, पंतप्रधान ग्राम सडक योजना, पाणीपुरवठा, भूमि अभिलेख, पशुधन विकास, तालुका आरोग्य अधिकारी, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, राज्य उत्पादन शुल्क, जलसंधारण, एसटी महामंडळ, गटशिक्षणाधिकारी, आरटीओ, वन परिमंडळ, घरकुल, नरेगा, विस्तार अधिकारी, कृषी सहाय्यक, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षिका यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीयांसाठी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व

काळ बदलला तरी 'प्रजासत्ताक दिना'चे महत्त्व कधीही कमी होणार नाही आणि येणाऱ्या प्रत्येक नव्या पिढीला या दिनाचे महत्त्व समजणे गरजेचे आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला ब्रिटिश साम्राज्यापासून स्वातंत्र्य मिळाले, परंतु फक्त तेवढेच पुरेसे नव्हते. देश म्हणून जगासमोर वाटचाल करताना राज्यघटना, कायद्यांची तरतूद, शासन, अर्थव्यवस्था या सगळ्यांची आवश्यकता असते. भारत देश लोकांचे राज्य होण्याची गरज होती म्हणूनच भारताचे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारले गेले आणि २६ जानेवारी १९५० रोजी ते अमलात आणले गेले. १९५० च्या राज्यघटनेसह, देश अधिकृतपणे भारतीय प्रजासत्ताक म्हणून ओळखला गेला.

एक 'सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताक देश' जो त्याच्या सर्व नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व या तत्त्वांनी सुरक्षित करतो आणि बांधून ठेवतो. आपल्या देशाची ओळख संपूर्ण जगाला समजावून सांगणारा 'प्रजासत्ताक दिन' म्हणूनच महत्त्वाचा ठरतो.

काळ बदलला तरी ङ्गप्रजासत्ताक दिनाफ्चे महत्त्व कधीही कमी होणार नाही आणि येणाऱ्या प्रत्येक नव्या पिढीला या दिनाचे महत्त्व समजणे गरजेचे आहे. आजच्या सोशल मीडियाच्या युगात प्रजासत्ताक दिन कशा पद्धतीने साजरा केला जातो हे बऱ्याच वेगवेगळ्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचत असते, परंतु या गोंधळामुळेच नवीन पिढीला केवळ साजरे करण्यापलीकडे याचा गाभा समजत नाही.

सध्या आपल्याकडे शालेय शिक्षणही विविध बोर्डांच्या शाळा, शिक्षणपद्धती यात विभागले गेले आहे. शालेय शिक्षणातून देशाची मूळ तत्त्वे, इतिहास याचे यथोचित ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतेच असे नाही. विविध ठिकाणी होणारे ध्वजारोहण, देशभक्तीपर कार्यक्रम, कर्तव्य पथावर होणारे सांस्कृतिक कार्यक्रम यापलीकडे तरुणांपर्यंत ङ्गप्रजासत्ताक दिनफ म्हणजे नेमके काय हे पोहोचते का? याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता हक्कांची पुरेशी जाणीव असलेल्या तरुण पिढीला त्यांची देशाप्रती असलेली कर्तव्ये, जबाबदाऱ्या याविषयीच पुरेशी माहिती नसल्याचे मत युवा अभ्यासकांनी व्यक्त केले.

आजच्या काळात हीच भावनिकता आणि समाजभान कदाचित कमी पडते आहे. हक्कांची वेळ येते तेव्हा सगळे धावून येतात, परंतु त्यांचीच दुसरी कर्तव्यांची बाजू मात्र लक्षात घेत नाहीत. भारत हा एकमेव तरुण



देश मानला जातो, कारण आपल्या देशात तरुणांची संख्या जगात सगळ्यात जास्त आहे, असे विराट सांगतो. ङ्गसोशल मीडियाचा वापर करून भारताला महान राष्ट्र बनवण्याची सुवर्ण संधी आमच्या पिढीकडे आहे. कायदा-सुव्यवस्था, समानता, स्वतंत्र्य, न्याय-अन्याय या सगळ्याचे अर्थ नव्याने समजून घेण्याची गरज आहे. देशभक्तीची भावना कुठे आणि किती दाखवायला हवी याचेही भान आज असणे गरजेचे आहे. इथे हेही लक्षात घेतले पाहिजे की लिबर्टी ही लक्झरी नसून एक जबाबदारी आहेफ असेही त्याने स्पष्ट केले.

आपल्या प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व यासाठी की जेव्हा ब्रिटिशांच्या ताब्यात अनेक देश होते ते स्वतंत्र होताना अनेक देशांची राज्यघटना ही ब्रिटिशांनीच लिहिली. परंतु आपल्याकडे भारतीयांनीच भारताची राज्यघटना लिहावी असा आग्रह तेव्हाच्या अनेक स्वातंत्र्य लढ्यातल्या वीरांचा होता आणि त्यांनी ते अमलात आणून दाखवले. संविधान तयार करताना भाषेच्या आधारावर प्रांत रचना करण्यात आली. त्यानंतर विधानसभेची रचना आणि संविधानातील विविध तरतुदी हे करण्यासाठी एक मोठा कालावधी गेला. हे संविधान तयार करून ते २६ जानेवारीला अमलात आणले गेले म्हणूनच या दिवसाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. प्रजासत्ताक दिन हा म्हणूनच भारताच्या ताकदीचे आणि लोकशाहीचे प्रतीक आहे. आपणच आपल्या भविष्याचे शिल्पकार आहोत, ही शिकवण या प्रजासत्ताक दिनानिमित्ताने मिळते.

दिल्लीतील कर्तव्य पथावर प्रजासत्ताक दिनाचे अतिशय देखणे सादरीकरण आपण दरवर्षी बघतो. संपूर्ण जगात भारतातच हा दिवस अशा पद्धतीने साजरा केला जातो. यावर्षी जवळपास ५००० सांस्कृतिक सादरीकरणे होणार असून विविध देशातून येणाऱ्या पाहुण्यांची संख्या दहा हजारांच्या आसपास आहे. या समारंभातले एक वैशिष्ट्य म्हणजे बिटिंग रिट्रीट समारंभ. या सोहळ्यात संपूर्ण देशाचा सांस्कृतिक वारसा आणि भारताच्या तिन्ही दलांना सलामी देण्यासाठीचे अनेक सुंदर कार्यक्रम सादर होतात. भारतातील सगळ्या राज्यांचे भव्य-दिव्य चित्ररथ सादर केले जातात. हा दिवस एकूणच भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि विविधतेचे प्रतीक आहे. जेव्हा आपण जागतिक स्तरावर स्वत:कडे पाहतो, तेव्हा आपल्याला आत्मविश्वास वाटतो कारण आपल्या लोकशाही मूल्यांसाठी आपला देश आणि पर्यायाने आपण ओळखले जातो. या दिवसाने आपल्या स्वातंत्र्याला खरा अर्थ दिला, ङ्गप्रजासत्ताक दिनफ हा या आत्मविश्वासाचे प्रतीक आहे.

# श्वानदंश

रात्री-अपरात्री घरी परतणे आता दिवसेंदिवस धोक्याचे बनत चालले आहे. ही भीती चोरट्यांची, लुटमार करणाऱ्यांची अथवा नशाबाज करणाऱ्यांची नसून भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवाची आहे. भटक्या कुत्र्यांकडून एकवेळ भुंकणे समजू शकते; परंतु अलीकडे या कुत्र्यांच्या झुंडीमुळे अनेकांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. ही समस्या कोणा भागापुरती मर्यादित राहिलेली नाही. यामुळे स्वत: सर्वोच्च न्यायालयाला भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर स्वत:हून याचिका दाखल करून घ्यावी लागली. समस्येचे गांभीर्य त्यातूनच दिसून येते. आपल्या देशात श्वानप्रेमींची संख्या लक्षणीय आहे. या श्वानप्रेमींना ही कुत्री स्वत:च्या घरात सांभाळायची नाहीत, तर रस्त्यावर, चौकाचौकांत असणाऱ्या भटक्या कुत्र्यांना खाद्य घालायचे आहे. एकीकडे श्वानांकडून होत असलेल्या उपद्रवाची जबाबदारी स्वीकारायची नाही आणि दुसरीकडे श्वानांविरोधात कारवाई केल्यास त्याविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलने करायची, न्यायालयाचे दरवाजे ठोठावयाचे अशा घटना श्वानप्रेमींकडून वाढू लागल्यात. रात्रीच्या वेळी उच्चभ्रू मंडळी आपल्या वाहनातून खाद्य घेऊन रस्त्यावर फिरणाऱ्या मोकाट कुत्र्यांचा शोध घेतात. राजधानी दिल्लीमध्ये सात महिन्यांच्या कालावधीत तब्बल २६ हजारांहून अधिक जणांना मोकाट कुत्र्यांनी चावे घेतल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला या समस्येची दखल घ्यावी लागली. दिल्लीमध्ये चावा घेण्याच्या संख्येत वाढ होत असली तरी यावर्षी जानेवारी ते जून दरम्यान ६५ हजारांपेक्षा अधिक कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण झाले आहे. महापालिका कार्यक्षेत्रामध्ये रात्रीच्या वेळी कचरा संकलन करणाऱ्या, कचरा वाहतूक कर्मचाऱ्यांना, धुरीकरण करणाऱ्यांना, मूषक नियंत्रण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना व रात्रीच्या वेळी जे नागरी समस्या निवारणाचे व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम करतात, त्यांना महिन्यातून अनेकदा कुत्र्यांच्या हल्ल्यांना सामोरे जावे लागते.

सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या आकडेवारीनुसार भारतात दरवर्षी कुत्रा चावण्याच्या ३७ लाखांहून अधिक घटना घडत; ३०५ लोक रेबीजमुळे मरण पावतात. केवळ निर्बीजीकरण पुरेसे नाही, मानवी जीवितांचे संरक्षण करणे आता आवश्यक झाले आहे. ३७ लाख हा आकडा कागदोपत्री असला, तरी प्रत्यक्षात हा आकडा अधिक असण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत असणाऱ्या कचराकुंड्या भटक्या कुत्र्यांचे माहेरघर बनले आहे. कचराकुंड्यांमध्ये सहजासहजी खाद्य उपलब्ध होत असल्याने भटक्या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी कचराकुंड्याभोवती दिसून येतात. घरात पाळल्या जाणाऱ्या कुत्र्यांची प्रशासन दरबारी नोंद करण्यास तसेच प्रशासनाकडे शुल्क भरणा करण्यास संबंधितांकडून टाळाटाळ केली जात असते. अनेकदा काही घटकांकडून लहानपणापासून घरामध्ये कुत्री पाळायची, पुढे तीच कुत्री रस्त्यावर सोडून दिली जातात.दिल्लीतील भटक्या कुत्र्यांना आश्रयस्थानात ठेवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर मुंबईतील भटक्या श्वानांच्या बंदोबस्ताची मागणी आता मुंबईकर नागरिकांकडून सुरू झाली आहे. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पनवेल, उरण, नवी मुंबई, बदलापूर, अंबरनाथ, वसई-विरार भागातही मोकाट कुत्र्यांकडून चावे घेण्याचे, हल्ले करण्याची समस्या गंभीर झाली आहे.



स्थानिक प्रशासनाकडून कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी श्वानाची धरपकड करण्याची मोहीम गल्लोगल्ली राबविली जात असते, त्यावेळी हे श्वानप्रेमी मोकाट कुत्र्यांना गच्चीवर तसेच सोसायटींच्या आवारात लपवून ठेवत असतात. गेल्या पंधरा वर्षांत १२ लाख ७३ हजार तर २०२४ मध्ये १ लाख ३५ हजार २५३ मुंबईकरांना भटक्या श्वानांनी चावा घेतला आहे. त्यामुळे, भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करून त्यांनाही आश्रयस्थानात हलवण्याची मागणी होत आहे. २०१४ च्या गणनेनुसार मुंबईत ९५ हजार १७४ भटके श्वान होते. गेल्या अकरा वर्षांत मुंबईतील भटक्या श्वानांची संख्या काही लाखांत गेली आहे. मुंबईत गेल्या २२ वर्षांत १६ लाख ६० हजार भटक्या श्वानांचा प्रश्न कायम आहे. दरवर्षी मुंबई महापालिका या भटक्या श्वानांची निर्बीजीकरण करत असते. मात्र, दर पावसाळ्यात हा प्रश्न ऐरणीवर येतो. भटक्या कुत्र्यांची समस्या नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वीच पालिकेने उपाय करण्याची मागणी होत आहे. मुंबईतील अनेक आमदारांनीही मतदारसंघातीलच नाही तर शहर व उपनगरातील भटक्या कुत्र्यांना आळा घालण्यासाठी महापालिकेकडे टाहो फोडला आहे. मुंबई पालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे काही आमदारांनी मुंबईतील भटक्या कुत्र्यांच्या नसबंदी करून, त्यांच्यासाठी आश्रयस्थाने तयार करून तेथे स्थलांतरीत करावे, अशी मागणी केली आहे. त्यामुळे, कुत्र्यांकडून हल्ले होण्याच्या घटना कमी होतील आणि सार्वजनिक सुरक्षेची वाढती चिंता कमी होण्यास मदत होईल, असा दावाही केला आहे. २००९ ते २०२४ या कालावधीत भटक्या श्वानांच्या नियंत्रणासाठी २४ कोटी ३ लाख २७ हजार रुपये खर्च करण्यात आले. भटक्या कुत्र्यांची समस्या मुंबईलगतच्या नवी मुंबई शहरातही आहे. तिथेही दिघा ते बेलापूरदरम्यान भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली आहे. यावर्षी जानेवारीपासून जुलै अखेरपर्यंत शहरात सात महिन्यांत ६ हजार ९३९ जणांना त्यांनी चावा घेतला. दिघा, ऐरोली व घणसोली तसेच एमआयडीसी परिसरात व गावठाण विभागात दहशत अधिक आहे. रात्रीच्या वेळी भटक्या कुत्र्यांच्या टोळ्या फिरताना नवी मुंबईमध्ये ठिकठिकाणी दिसतात. रात्री उशिरा घरी येणाऱ्यांच्या मनात भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली आहे. महापालिकेकडून श्वानांच्या निर्बीजीकरणाकडे दुर्लक्ष झाल्याने ही समस्या गंभीर झाल्याचा आरोपही होत आहे. भटक्या कुत्र्यांच्या समस्येची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली असली, तरी या समस्येवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या प्रशासनाला नागरिकांकडून सहकार्य मिळणेही तितकेच गरजेचे आहे.

# आता आरोग्य विमा महागणार

उपचारांच्या वाढत्या खर्चामुळे, सिंगल हेल्थ इन्शुरन्स कंपनी निवा बुपा चालू आर्थिक वर्षात (आर्थिक वर्ष २०२६) आरोग्य विमा पॉलिसींच्या प्रीमियममध्ये ८ ते ९ टक्क्यांनी वाढ करू शकते. स्टार हेल्थ तसेच इतर काही कंपन्याही प्रीमियममध्ये वाढ करू शकतात. कंपनीचे मुख्य वित्तीय अधिकारी (सीएफओ) विश्वनाथ महेंद्र यांनी ही माहिती दिली.महेंद्र म्हणाले की किमतीतील बदल उत्पादन चक्रावर अवलंबून असतो. गेल्या तिमाहीमध्ये आम्ही आमच्या रिॲशुअर २.० उत्पादनाचा प्रीमियम सात टक्क्यांनी वाढवला. पोर्टफोलिओ स्तरावर प्रीमियम आठ ते नऊ टक्क्यांनी वाढवण्याची योजना आहे. वेगवेगळ्या उत्पादनांमध्ये वेगवेगळे बदल चक्र असतात. उपचारांचा खर्च दर वर्षी वाढत असल्यामुळे दर वर्षी प्रीमियममध्ये मोठी वाढ करण्याऐवजी टप्प्याटप्प्याने करणे चांगले ठरते. कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये आपल्या रिॲशुअर २.० पॉलिसीच्या प्रीमियममध्ये सात टक्क्यांनी वाढ केली होती. स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स ही भारतातील सर्वांत मोठी सिंगल हेल्थ इन्शुरन्स कंपनीदेखील आपल्या आरोग्य विमा पॉलिसीचा प्रीमियम वाढवण्याची योजना आखत आहे. कंपनी यासाठी सवलत आधारित किंमत मॉडेल स्वीकारेल. याचा अर्थ असा की मूळ किंमत वाढू शकते; परंतु ग्राहकांना त्यांच्या आरोग्य स्थिती, दाव्याचा इतिहास किंवा पॉलिसी प्रकार इत्यादींवर आधारित सवलती मिळू शकतात. यामुळे पॉलिसींची किंमत अधिक वैयक्तिकृत होईल आणि अनेक लोकांसाठी प्रीमियम वाढीची भरपाईदेखील होईल.देशात वैद्यकीय महागाई दहा टक्क्यांहून अधिक दराने वाढत आहे. २०२५ मध्ये ती सुमारे तेरा टक्क्यांपर्यंत होती. २०२४ मध्ये ती बारा टक्क्यांपर्यंत होती. आरोग्य विम्याचा खर्च परवडण्याची क्षमता ही चिंतेची बाब आहे. अशा परिस्थितीत निवा बुपाने खर्च परवडण्याच्या क्षमतेवर आधारित पॉलिसी तयार केल्या आहेत. यामध्ये व्यवसायावर परिणाम न करता प्रीमियमवरील परिणाम कमी करण्यासाठी प्रादेशिक किंमत आणि इतर विविध उपायांचा वापर करण्यात आला.

## डॉक्टर टीप्स

### तुम्ही डेमिसेक्शुअल (demisexual) तर नाही, जाणून घ्या याचे लक्षण



मागील काही वर्षांमध्ये सेक्शुएलिटीबद्दल लोक जास्त खुलून बोलू लागले आहे. आता या मुद्द्यांवर प्रत्येक व्यक्ती आपले विचार आणि आवड निवड व्यक्त करू लागला. आहे. अलैंगिक, हा एक असा शब्द आहे ज्याबद्दल आतापर्यंत तुम्ही फारच कमी किंवा कदाचित ऐकले ही नसेल. यात ते लोक येतात ज्यांना सेक्सची इच्छा नसते किंवा जे रिलेशनशिपबगैर संबंध बनवण्यास तयार होऊन जातात आणि ते लोक मुलगी असो की मुलगा दोघांशी संबंध बनवण्यास तयार होऊन जातात.

डेमिसेक्शुअलचा अर्थ काय ?

जर तुम्ही डेमिसेक्शुअल असाल तर तुम्हाला फक्त त्या लोकांसोबत सेक्स करण्याची इच्छा होईल ज्याच्याशी तुम्ही प्रेम करता किंवा ज्या लोकांसोबत तुम्ही भावनात्मकजुळलेले आहात. डेमिसेक्शुएलिटीला ग्रे सेक्शुएलिटी देखील म्हटले जाते ज्यात सेक्सच सर्व काही नसत. **(क्रमशः)**

## विनोद




**सलमान : कॅटरीना सांग बरं भारतात चहा कुठं होतो?**
**कॅटरीना : सोपंच आहे, सगळ्या हॉटेलात.**

## संदेश

Larkio k chakar may mat Parhna "Dosto Q k..
Ye atey hy vEER ki tarha
....Lagty hy KHEER ki tarha
Chubhty hy TEER ki tarha Aur end main
Halat kr dety hy FAKEER ki tarha....

## सुविचार

जगात काही अजरामर नाहीतुमच्या चिंतासुद्धा!

**– अज्ञात**


### संस्कृत सुभाषित

**मृत्तिकानां सहस्त्रेण चोदकानां शतेन च।**
**न शुद्धयति दुराचारो भावोपहतचेतन:।।**

**अर्थ:**ज्याचे चित्त दुष्ट भावनांनी, विकारांनी भरलेले आहे असा दुराचारी हजार प्रकारची माती अंगाला फासून, तीर्थांत आंघोळ करून, शेकडो नद्यांत डुंबूनही शुद्ध होत नाही.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र.१



## आडवे शब्द

१. क्रिकेटमधील दोनशे
४. काळे मीठ
६. प्रधानमंत्री
९. चलनवलन
११. प्रमाणपत्र
१२. मुसलमान
१४. चाणाक्ष, हुशार
१६. वरपांगी
१८. पुष्पदल
१९. जोम, बळ
२०. शरम
२२. श्रीमंत
२५. गोदातीरावरील तीर्थस्थान
२७. श्रीरामाची चरित्रकथा
२८. पाचवा पांडव
३०. कपाळ फुटणे
३३. शरीर
३४. तेजस्वी, राजबिंडा
४०. गवत
४३. वाहणारी हवा
४४. शेराचा आठवा भाग
४६. धोबी
४७. निरूद्योगी
४९. चालढकल
५१. सुंदर तरुणी
५३. व्यर्थ
५४. गाय
५५. आचारी
५६. नवऱ्याची दुसरी पत्नी
५७. ओसाड (ग्रा.)
६०. ना नफा ना तोटा अशी स्थिती
६२. एकत्र येणे, गोळा होणे
६३. हिंदीत जवळ, इंग्रजीत उत्तीर्ण
६५. एकत्र होणे, गोळा होणे
६७. ही खरे तर साडेतीन हात एवढीच पुरे होते!
६८. जखमेवरील औषध
६९. पापडखार
७१. आधुनिक व्यवस्थापन तज्ज्ञांनाही उपयोगी असा समर्थांचा ग्रंथ
७३. व्रत
७५. नाहक द्वेष (ला.)
७७. सावध
७८. चलाख, चुणचुणीत
७९. निमग्न
८०. न दिसणारी जखम

## उभे शब्द

१. दुसरा
२. तृष्णा
३. मनाचा ओढा
४. गेलेला दिवस
५. भरभर
६. पर
७. सरोवर
८. किरकिरीचे हे वाद्य मुहूर्तालाच वाजल्यावर काम कसे होणार!
१०. हा आसूड हल्ली दाद देण्यासाठी प्रसिद्ध
११. नवरा (ग्रा.)
१३. पक्के आश्वासन
१५. जवळ, निकट
१७. रक्षण करणारा
१८. पर्ण
२१. जनमत, लोकनिर्णय
२२. टक्कर
२३. बडबड्या
२४. आई (ग्रा.)
२६. पवित्र, शंकर
२७. दानव
२८. पत्नी
२९. राजमहाल, प्रासाद
३१. पारा
३२. साखरपाकात मुरवलेला आवळा
३५. लांब वासा
३६. गुजराथी नृत्यप्रकार
३७. विष
३८. मातीचा कण
३९. एक खमंग वडी
४१. पौर्णिमा
४२. नाहक विषयांतर करणे
४४. विचित्र
४५. चटणी करण्याचे बिनविजेचे साधन
४८. हिंदीत काल आणि उद्या
५०. डोक्याभोवती गुंडाळण्याचे वस्त्र
५२. अभिप्राय
५७. जड
५८. सामोपचार
५९. राजा
६१. नशा आणणारे
६४. बरोबर, सारखा
६५. सुताराकडील दातेरी हत्यार
६६. शांत
६७. लोकांचा कल
६८. पुष्परस
७०. विशेष
७२. कुढत न बसणारा
७४. तात्पर्य
७६. नदीकाठ
७७. मोलभाव

## आडवे उत्तरे

१.द्विशतक ४.काललवण ६.पंतप्रधान ९.हालचाल ११.दाखला १२.यवन १४.अकलमंद १६.वरखल १८.पाकळी १९.रग २०.लाज २२.धनवान २५.नाशिक २७.रामायण २८.सहदेव ३०.कपाळमोक्ष ३३.देह ३४.राजस ४०.चारा ४३.वारा ४४.अदपाव ४६.रजक ४७.रिकामटेकडा ४९.टाळाटाळ ५१.रमणी ५३.फोल ५४.गो ५५.बल्लव ५६.सवत ५७.वसाड ६०.रमारम ६२.जमणे ६३.पास ६५.करवंद ६७.जमीन ६८.मलम ६९.टाकणखार ७१.दासबोध ७३.वसा ७५.सवतीमत्सर ७७.दक्ष ७८.तरतरीत ७९.रत ८०.मुका मार

## उभे उत्तरे

१.द्वितीय २.तहान ३.कल ४.काल ५.लवकर ६.पंख ७.तलाव ८.नकारघंटा १०.चाबूक ११.दादला १३.वचन १५.लगत १७.रक्षक १८.पान २१.जनादेश २२.धडक २३.वाचाळ २४.माय २६.शिव २७.राक्षस २८.सहचारिणी २९.राजवाडा ३१.पारद ३२.मोरावळा ३५.सरा ३७.गरळ ३८.रज ३९.बाकरवडी ४१.राका ४२.फाटे फोडणे ४४.अजब ४५.पाटा वरवंटा ४८.कल ५०.टापर ५२.मत ५७.वजनदार ५८.साम ५९.भूपाल ६१.मादक ६४.समकक्ष ६५.करवत ६६.नीरव ६७.जनमत ६८.मध ७०.खास ७२.बोलका ७४.सार ७६.तीर ७७.दर



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### निसपटू लिएंडर पेसचे वडील वेस पेस यांचे निधन, हॉकीमध्ये भारताला मि ळवून दिले होते ऑलिम्पिक पदक

कोलकाता-भारतीय क्रीडा क्षेत्राला धक्का बसवणारी बातमी आज कोलकात्यातून समोर आली आहे. माजी भारतीय हॉकीपटू वेस पेस यांचे वयाच्या ८०व्या वर्षी कोलकात्यातील एका रुग्णालयात निधन झाले. ते प्रसिद्ध टेनिसपटू लिएंडर पेस यांचे वडील होते आणि त्यांनी बीसीसीआयमध्येही आपली सेवा दिली होती.

ऑलिम्पिक आणि वर्ल्ड कपमध्ये रौप्यपदक विजेता संघाचा भाग ३० एप्रिल १९४५ रोजी जन्मलेले वेस पेस हे भारतीय हॉकी संघात मिडफिल्डर म्हणून खेळले. १९७२ च्या म्यूनिख ऑलिम्पिकमध्ये त्यांनी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले आणि त्या स्पर्धेत संघाने रौप्यपदक पटकावले. १९७१ मध्ये बार्सिलोना येथे झालेल्या हॉकी वर्ल्ड कपमध्येही ते रौप्यपदक विजेत्या संघाचा भाग होते. खेळाडू असण्याबरोबरच ते स्पोर्ट्स मेडिसिनचे डॉक्टर होते आणि अनेक वर्षे बीसीसीआयच्या डोपिंग विरोधी विभागात कार्यरत होते.

बास्केटबॉलपटूशी विवाह, मुलाने टेनिसमध्ये कमावले नाव

वेस पेस यांनी कलकत्त्यातील प्रेसिडेन्सी कॉलेजमधून प्री-मेडिकल शिक्षण पूर्ण केले आणि त्यानंतर लखनौच्या ला मार्टिनियर कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. त्यांचा विवाह लेखणी आणि क्रीडा या दोन्ही क्षेत्रात ओळख असलेल्या जेनिफर डटन यांच्यासोबत झाला. जेनिफर प्रसिद्ध बंगाली लेखक मायकेल मधुसूदन दत्त यांच्या परपोती असून, त्या १९७२ च्या ग्रीष्मकालीन ऑलिम्पिकमध्ये भारतीय महिला बास्केटबॉल संघाचा भाग होत्या. १९८२ मध्ये त्यांनी राष्ट्रीय संघाची कर्णधारपदही भूषवले.

लिएंडर पेसची ग्रँडस्लॅम कामगिरी

वेस पेस यांचा मुलगा लिएंडर पेसने टेनिसच्या मिक्स्ड डबल्स प्रकारात सर्व चार ग्रँडस्लॅम किताब जिंकले. त्याने ३ वेळा ऑस्ट्रेलियन ओपन (२००३, २०१०, २०१५), ४ वेळा विंबल्डन (१९९९, २००३, २०१०, २०१५), २ वेळा यूएस ओपन (२००८, २०१५) आणि १ वेळा फ्रेंच ओपन (२०१६) जिंकला आहे.

कार्सची आवड-वेस पेस आणि लिएंडर पेस या दोघांनाही गाड्यांचा विशेष शौक होता. लिएंडरने एका मुलाखतीत सांगितले होते की, ७०च्या दशकात त्यांच्या वडिलांकडे एम्बेसॅडर कार होती आणि ते दोघे मिळून तिची देखभाल करत, त्यावर खेळत असत.

***

### महाराष्ट्र संघाने अचानक कॅप्टन बदलला

मुंबई-टीम इंडियाचा स्टार खेळाडू ऋतुराज गायकवाडला देशांतर्गत क्रिकेटमध्ये मोठा धक्का बसला आहे. कारण महाराष्ट्र संघाने अचानक आपला कॅप्टन बदलला आहे. खरं तर गेल्या वर्षी महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदासाठी ऋतुराज गायकवाडच्या नावाची घोषणा करण्यात आली होती.पण अचानक आता अंकित बावणेला महाराष्ट्र संघाचा कर्णधार बनवलं आहे.त्यामुळे ऋतुराजला मोठा धक्का बसला आहे.महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने आगामी बूची बाबू २०२५ स्पर्धेसाठी १७ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे.या स्पर्धेत ऋतुराज गायकवाडला एक सामान्य खेळाडू म्हणून खेळण्यात येणार आहे. कारण महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी अंकित बावणेच्या खांद्यावर देण्यात आली आहे.त्यामुळे ऋतुराजला झटका बसला आहे.खरं तर गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीसाठी महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदाची माळ ऋतुराज गायकवाडच्या खांद्यावर दिली होती. पण त्यानंतर आता अचानक त्याच्या जागी अंकित बावणेचे नाव समोर आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.पृथ्वी शॉला संघात संधी-टीम इंडियातून अनेक वर्ष बाहेर असलेल्या पृथ्वी शॉला महाराष्ट्राच्या १७ सदस्यीय संघात संधी देण्यात आली आहे.पृथ्वी शॉने काहीच दिवसांपूर्वी मुंबईची साथ सोडत एमसीएसचे अध्यक्ष रोहित पवार यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र क्रिकेट संघात प्रवेश केला होता. तेव्हापासून त्याला संघात संधी मिळेल,असे बोलले जात होते. चेन्नईमध्ये अखिल भारतीय बुची बाबू स्पर्धा खेळवली जाणार आहे. ही स्पर्धा १८ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर दरम्यान खेळवली जाणार आहे. दरम्यान काही दिवसांपूर्वी बूची बाबू स्पर्धेसाठी मुंबई संघाचीही घोषणा करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनने (एमसीए) मंगळवारी मुंबईच्या १७ सदस्यीस संघाची घोषणा केली आहे. या स्पर्धेसाठी १८ वर्षीय आयुष म्हात्रेच्या खांद्यावर नेतृत्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. उपकर्णधारपदी सुवेद पार्कर असणार आहे.महाराष्ट्र संघ : अंकित बावणे (कर्णधार),ऋतुराज गायकवाड, पृथ्वी शॉ, सिद्धेश वीर, सचिन धस, अर्शिन कुलकर्णी, हर्षल काटे, सिद्धेश म्हात्रे, सौरभ नवाले (विकेटकिपर), मंदार भंडारी (विकेटकिपर),रामकृष्णा घोष,मुकेश चौधरी,प्रदीप दाधे, विकी ओसवाल,हितेश वालूंज, प्रशांत सोलंकी, राजवर्धन हंगेकर

## भारतीय संघाची ऑस्ट्रेलियावर मात




कॅनबेरा : ऑस्ट्रेलिया दौर्यावर असलेल्या भारत-अ महिला संघाने पहिला एकदिवसीय सामना जिंकला आहे. संघाने ऑस्ट्रेलियाचा ३ गडी राखून पराभव केला. बुधवारी ब्रिस्बेनमधील इयान हिली ओव्हल स्टेडियमवर झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने ४७.५ षटकांत २१४ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने ४२ षटकांत ७ गडी गमावून लक्ष्य गाठले.ऑस्ट्रेलियाकडून ॲनिक लिरॉयडने सर्वाधिक ९२ धावा केल्या. राहेल ट्रेनमनने ५१ धावांचे योगदान दिले. भारतीय संघाकडून राधा यादव सर्वात यशस्वी ठरली. तिने ३ बळी घेतले. तितस साधू आणि मिन्नू मणी यांनी प्रत्येकी २-२ बळी घेतले.भारताकडून यास्तिका भाटियाने ५९, शेफाली वर्मा ३६ आणि धारा गुर्जरने ३१ धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलियाकडून लुसी हॅमिल्टन आणि एला हेवर्ड यांनी २-२ विकेट घेतल्या. किम गार्थ, टेस फ्लिटॉफ आणि सिएना जिंजर यांनी १-१ विकेट घेतली.यापूर्वी, ऑस्ट्रेलिया-अ संघाने टी-२० मालिका ३-० ने जिंकली होती. संघाने पहिला सामना १३ धावांनी, दुसरा सामना ११४ धावांनी आणि तिसरा सामना ४ धावांनी जिंकला. एकदिवसीय मालिकेनंतर, २१ ऑगस्टपासून दोन्ही संघांमध्ये एकच अनधिकृत




## सुरेश रैना ईडी कार्यालयात

नवी दिल्ली : माजी भारतीय क्रिकेटपटू सुरेश रैना याची बुधवारी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) कथित अवैध ऑनलाईन सट्टेबाजी ॲपशी संबंधित आर्थिक अफरातफर प्रकरणात चौकशी केली, असे सूत्रांनी सांगितले.काल सकाळी ११ वाजता रैना ईडीच्या कार्यालयात दाखल झाला. त्यावेळी तो सीआयएसएफ कर्मचारी आणि ईडीच्या कर्मचार्यांशी संवाद साधताना दिसला. 'वन एक्स बेट' नावाच्या क्रीडाविषयक बेटिंग ॲप (ॲप्लिकेशन) शी संबंधित प्रकरणात ईडीने रैना याचा आर्थिक अफरातफर प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) जबाब नोंदवून घेतला, असे सूत्रांनी सांगितले.संबंधित ॲपशी रैनाचा काय संबंध हे ईडीचे अधिकारी जाणून घेत असल्याचे सूत्रांनी सांगितले.याच प्रकरणात ईडीने अलीकडेच गुगल आणि मेटाच्या प्रतिनिधींना चौकशीसाठी बोलावले होते. दोन दिवसांपूर्वी 'पॅरीमॅच' नावाच्या ऑनलाईन सट्टेबाजी ॲपशी संबंधित प्रकरणात ईडीने अनेक राज्यांत शोधमोहीम राबवली होती. 'वन एक्स बेट', 'पॅरीमॅच' सारख्या अनेक ॲप्सची ईडीकडून चौकशी सुरू आहे. अशा ॲप्सवर असंख्य व्यक्ती आणि गुंतवणूकदारांची कोट्यवधीची फसवणूक केल्याचा आणि मोठ्या प्रमाणावर कर चुकवल्याचा आरोप आहे. देशातील सुमारे २२ कोटी नागरिक अशा विविध ऑनलाईन सट्टेबाजी ॲप्सचे वापरकर्ते आहेत. याद्वारे १०० अब्ज डॉलर्सपेक्षा मोठी उलाढाल होते. २०२२ ते जून २०२५ या कालावधीत ऑनलाईन सट्टेबाजी आणि जुगार बंद करण्यासाठी दीड हजारांहून अधिक आदेश जारी केले आहेत, असे केंद्र सरकारने संसदेत सांगितले आहे.

## कुस्तीपटू सुशील कुमारला सर्वोच्च न्यायालयाचा दणका

नवी दिल्ली : भारताचा ऑलिम्पिक पदक विजेता सुशील कुमार अडचणीत सापडला आहे. १३ ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयाने ज्युनियर राष्ट्रीय कुस्ती चॅम्पियन सागर धनखड यांच्या हत्येतील प्रमुख आरोपी सुशील कुमारचा जामीन रद्द केला असून त्याला एका आठवड्यात पोलिसांसमोर हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.सुशील कुमार सागर धनखड यांच्या हत्येच्या आरोपाखाली बराच काळ तुरुंगात होता. या प्रकरणात त्याला दिल्ली उच्च न्यायालयाकडून जामीन मिळाला होता. पण आता सुशील कुमारला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा झटका बसला आहे. न्यायमूर्ती संजय करोल आणि प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठाने सुशील कुमारला जामीन देण्याचा दिल्ली उच्च न्यायालयाचा ४ मार्च रोजी दिलेला आदेश रद्द केला आहे. सागरचे वडील अशोक धनखड यांनी उच्च न्यायालयाने सुशील कुमारला दिलेल्या जामिनाच्या आदेशाविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर हा निर्णय देण्यात आला.




## भारत पाकिस्तानला इतके वाईट हरवेल की पाक संघाच्या माजी खेळाडूने स्वत:च्या देशाला सुनावले; म्हणाला...

दिल्ली-आशिया कप २०२५ येत्या ९ सप्टेंबरपासून खेळवला जाणार आहे. यामधील बहुप्रतिक्षित भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १४ सप्टेंबर रोजी होणार आहे. क्रिकेटप्रेमींच्या नजरा या सामन्यावर आहेत. पण यादरम्यान भारताने पाकिस्तानविरूद्ध आशिया कपमध्ये खेळण्यावर बहिष्कार टाकावा अशी मागणी केली जात आहे. पण दरम्यान पाकिस्तानच्या खेळाडूने मात्र भलतंच वक्तव्य करत आपल्या देशाची लाज काढली आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याबाबत पाक संघाचा माजी खेळाडू बासित अलीने मोठं वक्तव्य केलं आहे. बासित अलीने पाकिस्तान संघालाच कमी लेखत भारताने आशिया चषकातील सामना रद्द करावा यासाठी मी प्रार्थना करतो असं म्हटलं आहे. यामागचं कारणही त्याने सांगितलं आहे.

अलिकडेच, पाकिस्तानने वेस्ट इंडिजविरुद्ध खूपच खराब कामगिरी केली. वेस्ट इंडिजने पाकिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत २-१ असा विजय मिळवला. दोन्ही संघांमधील तिसऱ्या आणि अखेरच्या एकदिवसीय सामन्यात पाकिस्तानला जिंकण्यासाठी २९५ धावांची आवश्यकता होती, पण पाक संघ ९२ धावांवर सर्वबाद झाला. पाकिस्तानच्या या दारूण पराभवानंतर बासित अलीने द गेम प्लॅन यूट्यूब चॅनलवर बोलताना म्हटलं की, मफ्मी प्रार्थना करतो की भारत वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स सामन्याप्रमाणे आशिया कप सामन्यात पाकिस्तानविरुद्ध खेळण्यास नकार देईल. जर असं झालं नाही तर भारताचा संघ पाकिस्तानचा इतका मानहानीकारक पराभव करेल की तुम्ही कल्पनाही करू शकत नाही.फ्फ

यूट्यूब चॅनेलच्या होस्टने हसत हसत म्हटले की जर अफगाणिस्तानने या स्पर्धेत पाकिस्तानला पराभूत केलं तरी चकित होण्यासारखे काही नसेल. यावर बासित अली म्हणाला, मफ्जर आपण अफगाणिस्तानकडून हरलो तर देशातील कोणालाही फारसा फरक पडणार नाही, पण जर आपला संघ भारताकडून हरला तर सगळे वेडे होतील.फ्फ

आशिया कप २०२५ ९ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. भारत आणि पाकिस्तान एकाच गटात आहेत. दोन्ही संघांनी स्पर्धेसाठी आपला संघ अद्याप जाहीर केलेला नाही. भारताचा पाकिस्तानविरुद्ध टी-२० क्रिकेटमध्ये दमदार रेकॉर्ड आहे, दोन्ही संघांमध्ये खेळल्या गेलेल्या १३ पैकी दहा सामन्यांमध्ये भारताने विजय मिळवला आहे. २०२४ च्या टी-२० विश्वचषकादरम्यान दोन्ही संघांमध्ये अखेरचा सामना खेळला गेला. या सामन्यात पाकिस्तान १२० धावांचे लक्ष्यही गाठू शकला नाही आणि त्यांना सहा धावांनी पराभव पत्करावा लागला.

अलिकडच्या काळात पाकिस्तानला अमेरिका, झिम्बाब्वे आणि अफगाणिस्तान सारख्या साधारण संघांविरुद्ध अनेक मानहानीकारक पराभवांना सामोरे जावे लागले आहे. आशिया कपमध्ये पाकिस्तान कशी कामगिरी करणार यावरही सर्वांच्या नजरा असतील.

## सचिनच्या मुलाने गुपचुप उरकला साखरपुडा... कोण आहे तेंडुलकर घराण्याची होणारी सून?

मुंबई-माजी भारतीय क्रिकेट दिग्गज सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकर सध्या चांगलाच चर्चेत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, अर्जुन तेंडुलकरनं मुंबईतील उद्योगपती रवी घई यांची नात सानिया चांडोकशी साखरपुडा केला आहे. मात्र याबाबत अर्जुन किंवा सानियाच्या कुटुंबाकडून याबद्दल कोणतंही अधिकृत विधान आलेलं नाही. अर्जुन आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये गोव्यात खेळतो.कोण आहे सानिया : सानिया चांडोकबद्दल बोलायचं झालं तर, ती घई कुटुंबातील आहे. तिच्या कुटुंबाचे व्यवसाय साम्राज्य हॉटेल, रेस्टॉरंट आणि अन्न उद्योगात प्रसिद्ध आहे. त्यांच्याकडे इंटरकॉन्टिनेंटल मरीन ड्राइव्ह हॉटेल आणि ब्रुकलिन क्रीमरी (कमी कॅलरी आइस्क्रीम ब्रँड) आहे.देशांतर्गत क्रिकेटमध्ये गोव्याकडून खेळतो अर्जुन : २५ वर्षीय अर्जुन हा डावखुरा वेगवान गोलंदाज अष्टपैलू खेळाडू आहे जो देशांतर्गत क्रिकेटमध्ये गोव्याकडून खेळतो. तो आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स संघाचा भाग आहे. त्यानं २०२०२१ हंगामात मुंबईकडून त्याच्या देशांतर्गत कारकिर्दीची सुरुवात केली, जिथं त्यानं हरियाणाविरुद्धच्या टी-२० सामन्यात पदार्पण केलं. यापूर्वी, त्यानं ज्युनियर स्तरावर चांगली कामगिरी करुन भारताच्या अंडर-१९ संघात स्थान मिळवलं होतं. २०२२२३ च्या देशांतर्गत हंगामापूर्वी, तो गोव्यात गेला, जिथं त्यानं प्रथम श्रेणी क्रिकेट आणि लिस्ट ए मध्ये पदार्पण केलं.

## गिल, जयस्वाल ते श्रेयस अय्यर संघाबाहेरच?



नवी दिल्ली-पुढील वर्षी होणाऱ्या टी २० वर्ल्ड कपची तयारी म्हणून २०२५ चा आशिया कप टी २० फॉरमॅटमध्ये खेळवला जात आहे. पुढील महिन्या संयुक्त अरब अमिरातमध्ये आशिया कप स्पर्धा खेळवली जाणार आहे. भारतानं आशिया कप स्पर्धेसाठी अद्याप संघ जाहीर केलेला नाही. मात्र, त्याबाबत रोज नवनव्या अपडेट समोर येत आहेत. आशिया कपसाठी भारतीय संघात शुभमन गिल, यशस्वी जयस्वास, साई सुदर्शन आणि श्रेयस अय्यरला स्थान मिळण्याची शक्यता कमी आहे, असं सांगितलं जात आहे. सूत्रांच्या हवाल्यानं यासंदर्भात चर्चा सुरु आहेत. मात्र, बीसीसीआयनं अजून संघ निवडीबाबत अपडेट दिलेली नाही.

आशिया कप स्पर्धेला ९ सप्टेंबरपासून सुरुवात होईल तर स्पर्धेचा अंतिम सामना २८ सप्टेंबरला होणार आहे. भारताचा पहिला सामना १० सप्टेंबरला होणार असून १४ सप्टेंबरला भारत पाकिस्तान सामना होणार आहे. मात्र, भारताचा संघ अद्याप बीसीसीआयनं जाहीर केलेला नाही. आशिया कपचे सामने दुबई आणि अबू धाबीत होतील. नव्या अपडेटस नुसार निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांना संघात फार बदल करायचा नाही. या फॉरमॅटमध्ये जी टीम खेळत होती त्यांना पुन्हा संधी देण्याचा त्यांचा विचार आहे. त्यामुळं शुभमन गिल, यशस्वी जयस्वाल, साई सुदर्शन आणि श्रेयस अय्यर यांना आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करुन देखील संधी मिळणं अशक्य मानलं जातंय.

आशिया कपमध्ये भारताची सलामी संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा करु शकतात. जुलै २०२४ पासून भारतासाठी टी २० मध्ये सर्वाधिक धावा संजू सॅमसन यानं केल्या आहेत. दक्षिण आफ्रिकेत त्यानं तीन शतक केली आहेत. अभिषेक शर्मा टी २० क्रिकेटमध्ये पहिल्या स्थानावर आहे. यानंतर तिसऱ्या स्थानावर तिलक वर्माला संधी मिळू शकते. मधल्या फळीत सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या, रिंकू सिंग, शिवम दुबे, जितेश शर्मा यांच्या नावावर विचार केला जाऊ शकतो. फिरकी गोलंदाजीसाठी वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, अक्षर पटेल, कुलदीप यादवला संधी मिळू शकते. वेगवान गोलंदाजी हर्षित राणा, अर्शदीप सिंग आणि जसप्रीत बुमराह करु शकतात.

आशिया कपसाठी संभाव्य टीम इंडिया : अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (विकेटकीपर), सूर्यकुमार यादव (कॅप्टन), हार्दिक पांड्या, शिवम दुबे, रिंकू सिंग, अक्षर पटेल (उपकॅप्टन ), तिलक वर्मा, जितेश शर्मा (विकेटकीपर), कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती, वाशिंग्टन सुंदर, अर्शदीप सिंग, हर्षित राणा आणि जसप्रीत बुमराह

## आशिया चषकासाठी कर्णधारपदाच्या नावावर बीसीसीआय कडून शिक्का, गिल की यादव, कर्णधाराचे नाव जाहीर!

दिल्ली-क्रिकेटप्रेमींसाठी एक महत्वाची बातमी समोर आली आहे. सप्टेंबर २०२५ म्हणजे पुढच्या महिन्यापासून सुरु होणाऱ्या आशिया कप स्पर्धेसाठी भारतीय संघाच्या कर्णधाराच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. शुभमन गिल की सूर्यकुमार यादव? सा सर्वांनाच प्रश्न पडला होता. मात्र, सूर्यकुमार यादव हा आशिया कपमध्ये भारताचा कर्णधार असणार आहे.

सूर्यकुमार यादव आशिया कपमध्ये भारतीय संघाचं नेतृत्व करणार

भारताचा टी-२० चा कर्णधार सूर्यकुमार यादव हा पूर्णपणे तंदुरुस्त नव्हता. म्हणूनच आशिया कपमध्ये टीम इंडियाचे नेतृत्व कोण करेल? याबाबत तर्क वितर्क लढवले जात होते. मात्र, आता याबद्दल घोषणा करण्यात आली आहे. सूर्यकुमार यादव हाच आशिया कपमध्ये भारतीय संघाचं नेतृत्व करणार आहे. अशिया कप स्पर्धा ही आशियाई क्रिकेटमधील सर्वात प्रतिष्ठित स्पर्धा आहे. ही स्पर्धा ९ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर दरम्यान यूएईमध्ये खेळवली




जाणार आहे. बीसीसीआयने अद्याप या स्पर्धेसाठी टीम इंडियाची घोषणा केलेली नाही. यामागील कारण सूर्यकुमार यादव तंदुरुस्त नसणे हे आहे. अमात्र, अशातच बीसीसीआयने भारतीय संघाच्या कर्णधारपदी सूर्यकुमार यादवच्या नावाची घोषणा केली आहे. शुभमन गिल भविष्यात निश्चितच भारतीय संघाचा कर्णधार असेल, पण, २०२६ च्या टी२० विश्वचषकानंतरच त्याला टी२० मध्ये कर्णधारपद मिळेल असं बोललं जात आहे.

सूर्यकुमार यादव तंदुरुस्त, सराव सुरु

मिळालेल्या माहितीनुसार सूर्यकुमार यादव तंदुरुस्त झाला आहे. त्याने एनसीएमध्ये फलंदाजीचा सराव सुरू केला आहे. सूर्याच्या तंदुरुस्तीची अधिकृत माहिती काही दिवसांत येईल. २०२५ च्या आशिया कपमध्ये सूर्यकुमार यादव भारताचा कर्णधार असणार आहे.

आशिया स्पर्धेसाठी टीम इंडियाची घोषणा कधी होणार?

मिळालेल्या माहितीनुसार, १९ किंवा २० ऑगस्ट रोजी बीसीसीआय २०२५ च्या आशिया कपसाठी टीम इंडियाची घोषणा करण्याची शक्यता आहे. भारत गेल्या एक वर्षापासून टी-२० मध्ये वेगळ्या संघासोबत खेळत आहे. काही खेळाडूंनी त्यात चांगली कामगिरी देखील केली आहे. अशा परिस्थितीत, भारतीय व्यवस्थापन गेल्या एक वर्षात भारतासाठी टी-२० क्रिकेट खेळलेल्या खेळाडूंवर विश्वास दाखवू शकते.

आशिया कपसाठी भारताचा १५ सदस्यीय संघ कसा असू शकतो?

अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), सूर्यकुमार यादव (कर्णधार), हार्दिक पंड्या, श्रेयस अय्यर, रिंकू सिंग, अक्षर पटेल (उपकर्णधार), तिलक वर्मा, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती, वॉशिंग्टन सुंदर, अर्शदीप सिंग, हर्षित राणा आणि जसप्रीत बुमराह.

## दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त

# पोद्दार हॉस्पिटलच्यावतीने आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात २५६ रुग्णांची तपासणी








**लातूर/प्रतिनिधी :** दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या १३ व्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून येथील पोद्दार ऍक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने गुरुवार, दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरात एकूण २५६ रुग्णांची तपासणी करण्यात आल्याची माहिती पोद्दार हॉस्पिटलचे संचालक , ज्येष्ठ अस्थिशल्य चिकित्सक डॉ. अशोक पोद्दार यांनी दिली. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने घेण्यात आलेले यावर्षीचे हे १५७ वे मोफत आरोग्य शिबीर होते. यावेळी पोद्दार हॉस्पिटल आणि रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या संयुक्त विद्यमाने हेल्थ जनजागृती शिबीरही घेण्यात आले.

पोद्दार ऍक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने सातत्याने अशा प्रकारच्या मोफत अस्थिरोग व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येते. लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात मोफत आरोग्य शिबिरांची मूळ संकल्पनाच डॉ. अशोक पोद्दार यांच्या पुढाकारातून सुरु झाली आहे, हे विशेष. या शिबिराचे उदघाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या हस्ते झाले. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून दीपप्रज्वलनाने शिबिराचा प्रारंभ करण्यात आला. या प्रसंगी आयएमएचे अध्यक्ष डॉ. अभय कदम, डॉ. चेतन सारडा, डॉ. राजेश दरडे, डॉ. संजय शिवपुजे, डॉ. विश्रांत भारती , रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष अमोल दाडगे , सचिव पवन मालपाणी, प्रोजेक्ट चेअरमन श्रद्धानंद आपशेट्टी, अमोल बनाळे , पस्तापुरे , माजी उपमहापौर कैलास कांबळे, मंगेश कुलकर्णी, विजय रांदड, जयेश बजाज आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

पोद्दार हॉस्पिटल व रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या अस्थिरोग शिबिरात एकूण २५६ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. यामध्ये २२५ रुग्णांची हाडांच्या ठिसूळतेची मोफत तपासणी करण्यात आली. ६३ रुग्णांचे एक्सरे काढण्यात आले. ३२ रुग्णांची रक्त तपासणी तर १८० रुग्णांची फिजिओथेरपी करण्यात आली. शिबिरात सहभाग नोंदविलेल्या सर्वच्या सर्व रुग्णांना विविध नामांकित औषध कंपन्यांच्या वैद्यकीय प्रतिनिधींनी मोफत औषधी उपलब्ध करून दिली. या शिबिरात अस्थिरोग, फिजिओथेरपी मोफत करण्यात आली तर रक्त तपासणी, शस्त्रक्रिया शुल्कात ५० टक्के सूट देण्यात आली. हेल्थ इन्शुरन्स जनजागृती शिबिराच्या आयोजनातसाठी आयसीआयसीआय लोंबार्ड, रोटरी कल्लभ ऑफ लातूर मिडटावून व पोद्दार हॉस्पिटल परिवाराने पुढाकार घेतला होता. रुग्णांना यावेळी हेल्थ इन्सुरन्सचे महत्व पटवून देण्यात आले. त्याचप्रमाणे पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रुग्णांच्या नातेवाईकांसाठी अन्नसेवा उपक्रमही पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने राबविण्यात आला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते पाटील, उप अधिष्ठाता डॉ. उमेश कानडे, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके आदी मान्यवरांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत ही अन्नसेवा करण्यात आली.

पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या मोफत अस्थिरोग शिबिरास माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख, खासदार डॉ .शिवाजी काळगे यांनीही सदिच्छा भेट दिली. त्यावेळी डॉ.अशोक पोद्दार यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी मनोगत व्यक्त करताना धिरज देशमुख यांनी या उपक्रमाचे कौतुक करून डॉ. पोद्दार यांच्या वतीने सातत्याने राबविण्यात येणाऱ्या अशा प्रकारच्या मोफत आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधांची उपलब्धी होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनीही या अभिनव उपक्रमाबद्दल डॉ. पोद्दार व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे कौतुक केले. दिवंगत लोकनेत्याच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून लातुरात २०० पेक्षाही अधिक हॉस्पिटल्सच्या माध्यमातून आयोजित केल्या गेलेल्या मोफत आरोग्य शिबिरांचे समन्वयक म्हणून डॉ. अशोक पोद्दार यांनी उत्कृष्ट जबाबदारी पार पाडल्याबद्दलही धिरज देशमुख, खासदार डॉ. काळगे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

या शिबीर प्रसंगी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे पोद्दार हॉस्पिटलचे संचालक डॉ. अशोक पोद्दार यांनी स्वागत केले. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांची जयंती आणि पुण्यतिथी दिनाचे औचित्य साधून नियमितपणे अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन केले जाते. डॉ.अशोक पोद्दार हे आरोग्य तसेच सामाजिक क्षेत्रातही कायम कार्यरत असतात. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद खऱ्या अर्थाने जोपासण्याचे काम डॉ. अशोक पोद्दार आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्याने सातत्याने करत असतात. डॉ. अशोक पोद्दार यांनी यावेळी बोलताना अशा प्रकारच्या मोफत अस्थिरोग व तपासणी शिबिरांच्या माध्यमातून दरवर्षी हजारो रुग्णांची सेवा करण्याची संधी आपणास मिळते, असे सांगितले. भविष्यातही आपल्या हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने अशा प्रकारच्या मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ज्या समाजात आपण वावरतो, त्या समाजाचे देणे लागतो. अशा प्रकारच्या शिबीराच्या माध्यमातून आपण समाज ऋणातून अंशतः उतराई होण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांचे लातूरच्या वैद्यकीय क्षेत्राच्या उन्नतीसाठी भरीव योगदान राहिले आहे. या क्षेत्रातील अद्यावत उपचार यंत्रणा, अद्यावत मशिनरी लातूरमध्येही रुग्णसेवेसाठी उपलब्ध असली पाहिजे, या भावनेने त्यांनी सर्व तज्ज्ञ डॉक्टर मंडळींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे काम केल्याची भावना डॉ. पोद्दार यांनी बोलून दाखविली. प्रतिवर्षाप्रमाणे यावेळीही शिबिरादरम्यान दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या गाजलेल्या भाषणांच्या चित्रफिती उपस्थितांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

या शिबीरात डॉ. अशोक पोद्दार यांच्यासह पुण्याच्या संचेती हॉस्पिटलचे डॉ. पार्थ शहा, डॉ.इमरान कुरेशी, डॉ. प्रितम , डॉ. मंगेश कुलकर्णी, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. मुंडकर, डॉ. श्रुती, डॉ.साक्षी सारडा, डॉ. निकिता ब्रिजवासी यांनी रुग्णांची तपासणी व उपचार केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी हॉस्पिटलचे प्रशासकीय अधिकारी वसीम शेख यांसह हॉस्पिटलचे सर्व कर्मचारी, मेडिकल रिप्रेझेंटिटीव्ह यांनी परिश्रम घेतले.

## कंत्राटदारांचे सहा दिवस चाललेले आमरण व साखळी उपोषण पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या आश्वासनानंतर तात्पुरते स्थगीत

### थकलेली बीले मिळण्यासाठी संबंधीत खात्याच्या मंत्र्यांकडे पालकमंत्री म्हणुन पाठपुरावा करणार



**लातूर/प्रतिनिधी – :** शासनाच्या विविध विभागाकडे कामांची थकलेली बिले मिळावे या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कंत्राटदारांनी आमरण व साखळी उपोषण सुरु केले होते. उपोषणाच्या सहाव्या दिवशी गुरुवार (दि. १८) रोजी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी उपोषण स्थळी भेट देऊन कंत्राटदारांसोबत सविस्तर चर्चा केली. प्रलंबीत देयके मंजुरी साठी संबंधित खात्याच्या मंत्र्याकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले तसेच कंत्राटदार, मुख्यमंत्री, अर्थमंत्री व संबंधीत खात्याचे मंत्री यांची संयुक्तीक बैठक घेण्यासाठी पालकमंत्री म्हणुन समन्वय साधानार असल्याचा शब्द देऊन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रलंबीत असलेले सर्व बिले डिसेंबर पर्यंत टप्प्या टप्प्याने अदा करणार असल्याचे सांगीतले. आदी आश्वासना नंतर पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते आमरण उपोषण कर्ते विजय शेट्टे यांना फळांचा रस पाजून उपोषण सोडण्यात आले.

बिल्डर असोशिएशन ऑफ इंडीया लातूर सेटरच्यावतीने शासनाच्या विविध विभागाकडे जिल्ह्यातील कंत्राटदारांची जवळपास दहा हजार कोटींवर बिले थकलेली होती. यामुळे थकलेली बीले मिळावीत या मागणीसाठी मागील सहा दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण व साखळी उपोषण करण्यात येत होते. याची दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी उपोषण स्थळी भेट देऊन कंत्राटदारांसोबत सविस्तर चर्चा केली. कंत्राटदारांचे शासनाच्या विविध विभागाकडे प्रलंबित बिले अदा व्हावी यासाठी जिल्हयाचा पालमंत्री म्हणुन पाठपुराव करणार असल्याचा शब्द देखील शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिला. या आश्वासनावर समाधान झाल्यामुळे बिल्डर असोशिएशन ऑफ इंडीया लातूर सेटरच्यावतीने आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

**पालकमंत्र्यांच्या आश्वासना नंतर उपोषण तात्पुरते स्थगीत केले – बिल्डर असोशिएशन ऑफ इंडिया**

जिल्ह्यातील कंत्राटदारांची थकलेली बिले मिळावित यासाठी सलग सहा दिवस जिल्हधिकारी यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येत होते. याची दखल घेऊन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले उपोषण स्थळी येऊन भेट घेतील व विविध विभागाकडे थकलेली बिले लवकर अदा व्हावीत यासाठी पालकमंत्री म्हणुन पाठपुरावा करण्याचा शब्द देऊन उपोषण थांबविण्याची विनंती केली त्यामुळे त्यांच्या शब्दाला मान देऊन बिल्डर असोशिएशन ऑफ इंडिया लातूर सिटी सेंटरच्या वतीने सदरील आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## १९४१ फूट लांबीच्या तिरंगा ध्वज रॅलीने परिसर दुमदुमला



**अहमदपूर/प्रतिनिधी :** स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या हर घर तिरंगा अभियानांतर्गत ११४१ फूट तिरंगा ध्वज प्रतिकृतीची तिरंगा रॅली अतिशय उत्साह पूर्ण वातावरणामध्ये संपन्न झाली. संपूर्ण शहरात भारत माता की जय,भारतीय तिरंगगा ध्वजाचा विजय असो अशा घोषणांनी शहर दुमदुमून गेले.

या तिरंगा रॅलीचे उद्घाटन नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी आमदार बब्रुवान खंदाडे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विचार विकास मंडळाचे संचालक देशमुख सर,उपविभागीय पोलीस अधिकारी भातलवंडे सर,महात्मा गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पवार सर,प्रा.जुगल किशोर शर्मा,जेष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे,माजी अध्यक्षा सरस्वतीबाई कांबळे आदींची उपस्थिती होती.

तर तक्षशिला बुद्ध विहाराचे भंते महाविरो थेरो,किशन महाराज परचंडेकर,शाही इमाम मौलाना जागीरदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील रॅलीची सूरूवात महात्मा गांधी महाविद्यालयापासून निघून शहरातील मेन रोड,आझाद चौक,हनुमान मंदिर,हिना लॉज डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या समोरून निघून छत्रपती शिवाजीमहाराज पुतळ्या समोर रॅलीचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

या रॅलीत विविध शाळा महाविद्यालयाचे विद्यार्थी एनसीसी,एनएसएस चे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झालेले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सम्राट मित्र मंडळाचे अध्यक्ष डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी, यांनी केले तर अध्यक्षीय समारोप माजी आमदार बब्रूवान खंदाडे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे यांनी मानले.

अहमदपूरातील मुख्य रस्त्यावरून ११४१ फुटाचा तिरंगा ध्वज प्रतिकृती रॅली निघाल्यानंतर या तिरंगा रॅलीवर शहरातील नागरीकांनी जागोजागी पुष्पवृष्टी केली.

एनसीसी,एनएसएस व शालेय विद्यार्थ्यांनी या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी नोंदविला होता.

या तिरंगा रॅलीमध्ये विविध राष्ट्रभक्तीपर गीते, महापुरुषांच्या नावांच्या जय घोषणा,तिरंगा ध्वज घोषणांनी संपूर्ण अहमदपूर शहर दुमदुमून गेले होते.

रॅलीच्या सुरुवातीला रथामध्ये विविध धर्माचे धर्मगुरू यांना बसविण्यात आले होते यातून राष्ट्रीय एकात्मता सर्व धर्म समभावाचा संदेश दिला गेला.

अधून मधून पावसाच्या सरी येत होत्या तरीही मोठ्या उत्साहात विद्यार्थी तिरंगा ध्वज खांद्यावर घेऊन मार्गक्रमण करत होते हे चित्र डोळ्याचे पारणे फेडून गेले.

या रॅली मध्ये विद्यार्थ्यांच्या हातात राष्ट्रपुरुषांच्या महापुरुषांच्या फोटो लक्षवेधी ठरत होते.

## मध्य रेल्वे सोलापूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई वंदे भारत एक्सप्रेस २० कोचसह चालवणार

### प्रवाशांसाठी ३१२ अतिरिक्त आसने उपलब्ध करून देण्यासाठी ४ अतिरिक्त चेअर कार कोच



**मुंबई/प्रतिनिधी :** सोयीस्कर प्रवास सुलभ करण्यासाठी प्रवाशांच्या मागणी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने सोलापूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी), मुंबई वंदे भारत एक्सप्रेसमध्ये ४ अतिरिक्त चेअर कार कोच वाढवण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे खाली दिलेल्या तपशीलांनुसार ट्रेनची लांबी २० कोचपर्यंत वाढेल:

- ट्रेन क्रमांक २२२२५ सीएसएमटी मुंबई-सोलापूर वंदे भारत एक्सप्रेस २८.०८.२०२५ पासून प्रभावी.
- ट्रेन क्रमांक २२२२६ सोलापूर-सीएसएमटी मुंबई वंदे भारत एक्सप्रेस २९.०८.२०२५ पासून प्रभावी.

सुधारित कोच रचना: २० कोचमध्ये – २ एक्झिक्युटिव्ह चेअर कार (EC) मध्ये ५२ आसन क्षमता आहे.

- १६ चेअर कार (CC) मध्ये ७८ आसन क्षमता आहे.
- २ चेअर कार (CC) जे कि लोको पायलट आणि गार्ड केबिनच्या शेजारी आहेत ज्यामध्ये ४४ आसन क्षमता आहे.

एकूण आसन क्षमता – १४४० या अपग्रेडमुळे मुंबई आणि सोलापूर दरम्यान प्रवाशांना अधिक आसन क्षमता, चांगली सोय आणि सुरळीत प्रवास मिळेल. ४ अतिरिक्त कोचमुळे प्रवाशांना ३१२ अधिक आसने मिळतील.

सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक श्री योगेश पाटील यांनी प्रवाशांना या अपग्रेड केलेल्या सुविधेचा जास्तीत जास्त फायदा घेण्याचे आणि देशाच्या प्रतिष्ठित वंदे भारत एक्सप्रेसमध्ये प्रीमियम प्रवासाचा अनुभव घेण्याचे आवाहन केले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# कोणी कोणाच नाही – नात्याची मोकळा दोर आणि स्वार्थी काळाची गोष्ट

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी जगात कोणी कोणाचे नाही हे मन केवळ वाक्य रूपात नाही तर प्रत्यक्ष वास्तवात उतरले आहे रक्ताच्या नात्यापासून ते जिवलग मित्र पर्यंत सर्व नाती आता स्वार्थाच्या काट्यावर तो ल ली जात आहेत  पूर्वी घरात कोणी आजारी पडलं तर सगळं गाव धावून येत असे आज मात्र घरातलेच माणसे नजरेला नजर देणे टाळतात. वृद्ध आई-वडिलांना आधार देणे दूरच उलट त्यांना वृद्धाश्रमाचा दाराशी सोडून नात्याची जबाबदारी संपल्याचा समाधान दाखवतात मुले मोठी झाली की, आपाआपलं कॅरिअर नोकरी परदेशातील धैर्य यामध्ये इतकी गुंततात की ज्याच्या आधारावरती उभे राहिले त्यांची चौकशीही वर्षातून दोनदा एकदा करतील मित्र-मैत्रिणीच्या गप्पा आत्ता चहाच्या टपरीवर नव्हे तर सोशल मीडियाच्या लाईक आणि टेटस पुढ त्याच मर्यादित झाले आहेत. यामागे फक्त आर्थिक धावपळ नाही तर मनाचा थंडपणा स्वार्थ आणि माझं माझं या विचारसरणीचा पगडा आहे.

गरजेच्या वेळी माणसे हसून भेटतात काम झाले की तोंड ओळखत नाहीत सुखात सारे सोबत पण दुःखाच्या वेळी हाताला हात देणारा कोणी मिळणं दुर्मिळ झाला आहे या काळी आपल्याला शिकवतो पैशापेक्षा माणूस जपा कारण शेवटी पैशाने औषध मिळतील पण मायेचा हात नाही नाती जीवन ठेवायचे असतील तर स्वार्थाचा गळफास सोडून वेळ सात आणि प्रेम द्या कारण हीच खरी संपत्ती आपली आहे.

# प्रा. सोमनाथ लांडगे यांचा अहिल्या सखी मंचच्यावतीने सत्कार



धाराशिव (प्रतिनिधी)-येथील शैक्षणिक व सामाजिक चळवळीत सक्रिय असलेले श्री साई श्रध्दा एज्युकेशन, नीट ऑनलाईन टेस्ट सीरिजचे संचालक तसेच बील गेट्स जुनिअर कॉलेजचे प्राचार्य तथा अहिल्या सखी मंचचे मार्गदर्शक प्रा. सोमनाथ लांडगे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर 'राज्यस्तरीय कार्य गौरव' पुरस्कार अमरावती येथील अंबाई बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दि. ११ जून २०२५ रोजी अमरावती येथे समारंभ पुर्वक पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

तसेच अहिल्यानगर येथील जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने अहिल्यानगर येथे राज्यस्तरीय आदर्श कृतिशील शिक्षक पुरस्कार मिळालेला आहे. त्यामुळे अहिल्या सखी मंचच्या वतीने काल सायंकाळी साडे-पाच वाजता प्रा. सोमनाथ लांडगे सरांच्या सत्कार समारंभाचे आयोजन त्यांच्या श्री साई श्रद्धा एज्युकेशन कार्यालयात आयोजित करण्यात आलेले होते. यावेळेस प्रा. सोमनाथ लांडगे यांचा सन्मान करण्यात आला. प्राचार्य डॉ. शैलजा पैकेकर यांनी लांडगे सर आपल्या नीट ऑनलाईन टेस्ट सिरीज च्या माध्यमातून अनेक गोरगरीब व ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून देत आहेत. त्याचबरोबर गोरगरीब विद्यार्थ्यांना अर्थिक मदत करत आहेत. ही आपल्यासाठी आनंदाची व प्रेरणादायक गोष्ट असल्याचे सांगून आम्ही अहिल्या सखी मंच म्हणून आपल्या सोबत असल्याचे सांगीतले. आम्ही महिला अहिल्या सखी मंच म्हणून सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर राहणार आहोत आम्हालाही साथ द्या, असे प्रतिपादन केले. प्रा. सोमनाथ लांडगे यांनी आपला महिला भगिनींनी केलेला सन्मान सदैव प्रेरणादायक राहील व पुढे कार्य करण्यास प्रोत्साहन मिळेल असे सांगून अहिल्या सखी मंचच्या कार्याला अशीच गती मिळत राहो अशी भावना व्यक्त करून अभार मानले. यावेळी सौ. प्रमिला बावकर, प्राचार्य रेखा जेवळीकर, ॲड. जयश्री तेरकर, अर्चना मैंदाड व उषाताई लांडगे उपस्थितीत होते

# तालुकास्तरीय लोकशाही दिन १८ ऑगस्ट रोजी तुळजापूर येथे आयोजन

धाराशिव (जिमाका)- तुळजापूर तहसील कार्यालय येथे १८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे.अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज दोन प्रतीत,कार्यक्रमापूर्वी १५ दिवस आधी सादर करणे आवश्यक आहे.

महत्त्वाच्या सूचना :अर्जदाराने संबंधित तालुक्यातील लोकशाही दिनी (महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी) अर्ज दिलेला असावा आणि एक महिन्यानंतरही कार्यवाही न झाल्यासच जिल्हास्तरावर अर्ज करता येईल. टोकन क्रमांकाची तहसीलदार स्वाक्षरीयुक्त पावती आवश्यक.

स्वीकारले जाणार नाहीत अशा बाबी पुढीलप्रमाणे आहेत.न्यायप्रविष्ट प्रकरणे, महसूल/अपील विषयक बाबी,सेवासंबंधी आस्थापना बाबी, अपूर्ण अर्ज किंवा आवश्यक कागदपत्रांशिवाय सादर केलेले अर्ज.

आधीच जिल्हास्तरीय लोकशाही दिनी अर्ज देऊन कार्यवाही सुरू असलेल्यांनी पुन्हा अर्ज करू नये.विहित नमुन्यातील अर्ज https://dharashiv.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

# पी.एम.श्री स्कूल,तुळजापूर ११ वी सायन्स प्रवेशासाठी अर्जाची २० ऑगस्टपर्यंत मुदत

धाराशिव (जिमाका) -पी.एम.श्री स्कूल,जवाहर नवोदय विद्यालय,तुळजापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी इयत्ता ११ वी (सायन्स) प्रवेशासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. प्रवेश अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत वाढवून २० ऑगस्ट २०२५ करण्यात आली आहे. अर्ज ऑनलाईन तसेच ऑफलाईन दोन्ही पद्धतीने स्वीकारले जातील.विद्यालयाचे प्राचार्य श्री.के.वाय.इंगळे यांनी पालक व विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. ही संधी १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे.

अर्जासाठी लिंक :ऑनलाईन फॉर्म: forms.gle/MchW4NbiHQLLceMg8

ऑफलाईन फॉर्म: drive.google.com/file/d/1bflCvf... यावर उपलब्ध आहे. असे प्राचार्य श्री.के.वाय इंगळे यांनी कळविले आहे.

# बसमध्ये बसल्या असता सोन्याने, चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरली

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-विद्या राजेश पांढरे, वय २५ वर्षे, रा. तांबरी विभाग धाराशिव ता. जि. धाराशिव या दि. १३.०८.२०२५ रोजी बसस्थानक धाराशिव येथुन कोळेवाडी येथे जाण्यासाठी धाराशिव ते मुरुड बसमध्ये बसल्या असता विद्या पांढरे यांचे ९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व रोख रक्कम ३,००० असा एकुण ३९,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी विद्या पांढरे यांनी दि.१३.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# ज्या गावात आरोग्य सुविधा नाहीत, तेथे आरोग्य शिबिर: पुढील चार महिन्यात ३५० शिबिरांचे नियोजन- आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे आरोग्य यंत्रणेला निर्देश

धाराशिव (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील ज्या गावांमध्ये स्थायी आरोग्य सुविधा उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी पुढील चार महिन्यात ३५० आरोग्य शिबिर आयोजित करण्यात येणार आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य विषयक गरजांची पूर्तता अधिक प्रभावीपणे करण्याच्या दृष्टीने मित्रचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी आरोग्य यंत्रणेला तसे निर्देश दिले आहेत. आरोग्य शिबिरांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

स्थायी आरोग्य सेवा उपलब्ध नसलेल्या जिल्ह्यातील प्रत्येक गावात महिन्यातून किमान एक तरी आरोग्य शिबीर आयोजित करण्याचा महत्वाकांक्षी उपक्रम आमदार पाटील यांनी हाती घेतला आहे. मागील आठवड्यात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

३५० शिबीरांमध्ये गंभीर आजार आढळलेल्या रुग्णांवर पुढील उपचार व आवश्यक शस्त्रक्रिया होईपर्यंत त्याचा उपलब्ध तंत्रज्ञ वापरून पाठपुरावा करण्याचे निर्देशही त्यांनी आरोग्य विभागाला दिले होते.

सास्तुर येथील स्पर्श रुग्णालयामार्फत राबविण्यात येत असलेली 'फिरता दवाखाना' ही संकल्पना ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र नसलेल्या प्रत्येक गावात आता अंमलात आणली जाणार आहे. यासाठी किमान २० मोबाईल दवाखाना एम्बुलेंस आवश्यक असून त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची चर्चाही यावेळी करण्यात आली. सध्या जिल्ह्यात या प्रकारच्या तीन मोबाईल व्हॅन उपलब्ध आहेत.

आयुष्यमान कार्डच्या माध्यमातून एका कुटूंबासाठी ५ लाखापर्यंतचे मोफत औषधोपचार केले जातात. आरोग्य शिबीरादरम्यान आयुष्यमान कार्डविषयी जनजागृती करून जास्तीत जास्त कुटूंबाचे आयुष्यमान कार्ड तयार करण्याच्या सूचनाही आमदार पाटील यांनी यावेळी दिल्या. तसेच रुग्णांचा डिजीटाईज्ड डेटा तयार करण्याचे देखील यावेळी सांगण्यात आले आहे. पुढील वर्षभरात जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या आरोग्य शिबिरांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात या महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.चौहान, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.धनंजय चाकुरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.एस. एल. हरिदास यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. आरोग्य शिबिरांमध्ये रुग्णांची तपासणी करणे प्राथमिक उपचार देणे व पुढील उपचाराची गरज असलेले रुग्ण शोधणे या बाबींवर भर दिला जाणार आहे. रुग्ण पुढील उपचारासाठी गरजेनुसार जिल्हा स्तरावरील शासकीय रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, आयुर्वेदिक महाविद्यालय, -खखचड तसेच इतर रुग्णालयामध्ये पाठविण्याची प्रक्रिया करण्यात येईल असेही बैठकीत ठरले आहे. यासाठी तपासण्यात येणाऱ्या रुग्णांची माहिती डिजिटल स्वरूपात जतन करणे गरजेचे आहे. यातून रुग्णांची माहिती, तपासणी रेकॉर्ड, तसेच पुढील उपचार पद्धतीवर लक्ष देणे शक्य होणार आहे. याबाबत सर्वांशी चर्चा करून बैठकीत प्राथमिक नियोजन करण्यात आलेले आहे.

जिल्ह्यातील गोर-गरीब रुग्णांना वेळेत आरोग्य उपचार मिळावेत याकरिता दर आठवड्याला किमान एक आरोग्य शिबीर आयोजित करण्याबाबत अधिष्ठाता, शासकीय महाविद्यालय यांना सूचित करण्यात आले. जिल्हा सामान्य रुग्णालय, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत देखील आरोग्य शिबीरे आयोजित करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. या चारही यंत्रणांचा आरोग्य शिबीराचा एकात्मिक आराखडा तयार करण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात आले आहे.

# कनगरा येथील सरकारी जमिनीवरील अतिक्रमणाबाबत महसूल विभागाचे तत्पर पाऊल



धाराशिव, ऑगस्ट -कनगरा ( जि. धाराशिव) येथील गट क्र. १७२ मधील सरकारी जागेवर झालेल्या अतिक्रमण प्रकरणात महसूल विभागाने तातडीने कार्यवाही सुरू केली आहे. उपअधीक्षक भूमिअभिलेख धाराशिव दिलीप मोरे यांनी संबंधित प्रकरणी नोटीस बजावून व चौकशी आदेशित करून आवश्यक ती पावले उचलली आहेत.

सदर प्रकरणात गावातील श्री. मोहन बाबूसाहेब सुरवसे व इतरांनी दिलेल्या तक्रारीनुसार, गट क्र. १७२ मधील जमिनीवर काहींनी बेकायदेशीररित्या बांधकाम व वापर सुरू केल्याची माहिती मिळाली. यासंदर्भात जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांच्या बैठकीत तातडीने तपास व कारवाईसंदर्भात निर्णय घेण्यात आला.

महसूल विभागाने पंचनामे, जमीन नोंदी व चौकशी अहवालांच्या आधारे ही जागा सरकारी असल्याचे स्पष्ट केले असून, अतिक्रमण करणाऱ्यांना जागा रिकामी करण्याचा आदेश दिला आहे. तसेच, प्रकरणाची पूर्ण छाननी होईपर्यंत कोणत्याही प्रकारचे बांधकाम किंवा वापर थांबविण्यासही निर्देश देण्यात आले आहेत.

तक्रारीत नमूद व्यक्तींनी ९ ऑगस्ट २०२५ रोजीही संबंधित जागेवर बेकायदेशीर हालचाली सुरू ठेवल्याने, महसूल अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या मदतीने पुढील कार्यवाहीसाठी संयुक्त पथक तयार करण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत पोलीस ठाण्याचे निरीक्षक व संबंधित विभागीय अधिकारी यांना समन्वय साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

ही कारवाई महसूल, पोलिस व ग्रामपंचायत प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नाने करण्यात येणार असून, सरकारी जमिनीवरील अतिक्रमण रोखण्यासाठी ही मोहीम कायम ठेवली जाणार आहे, असे उपअधीक्षक भूमिअभिलेख दिलीप मोरे यांनी स्पष्ट केले

# लोहाऱ्यातील गावांसाठी एमव्हीए उपकेंद्र मंजूर करा जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन



लोहारा येथील महावितरणच्या उपविभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या खेड, हिप्परगा (रवा), वडगाव (गां), सालेगाव, सुपतगाव व तुगाव या गावांमध्ये एमव्हीए उर्जा क्षमतेचे उपकेंद्र मंजूर करण्यासाठी आपल्या स्तरावरून तत्काळ मंजुरी देण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. खेड येथील महादेव धारुळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत हे निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, खेड, हिप्परगा (रवा), वडगाव (गां), सालेगाव, सुपतगाव, व तुगाव या गावांमध्ये शेती व घरगुती वीज पुरवठा कमी दाबाने व अपुरा होत असून वीज वारंवार खंडीत होत आहे. महावितरणकडे याबाबत अनेकदा मागणी केली. यामुळे शेतातील विद्युतपंप, मोटारी, घरातील विजेची उपकरणे जळत आहेत. विजेच्या कडकडाटात कमी पाऊस पडल्यास वीज पुरवठ्याच्या खांबावरील इन्सुलेटर फुटून, विजेचे खांब जमिनीवर पडतात. यामुळे वीजपुरवठा २० ते ३० तास खंडीत होतो. यामुळे पाण्याअभावी पिके करपतात. शेतीच्या उत्पादनात मोठी घट होत आहे. जुन्या उपकेंद्रातून नवीन वीज वाहिन्या काढण्यासाठी जागा उपलब्ध नाही. उपकेंद्रातही जागा नाही. त्यामुळे नवीन उपकेंद्राचे प्रस्ताव महावितरणला यापूर्वीही दिला आहे, असे धारुळे यांनी सांगितले. त्यामुळे एमव्हीए उर्जा क्षमतेचे उपकेंद्र मंजूर करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी मंजुरी द्यावी. निवेदन देतेवेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे (पवार) तालुकाध्यक्ष नरदेव कदम, महादेव धारुळे उपस्थित होते.


## लातूर समाचार उस्मानाबाद

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649